**GURUKUL INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL**

**ISSN No. 2394-8426**

With **International Impact Factor 2.254**

Published by

# Special issue

On Titled

# संशोधन शिल्प

**-: Guest Editor :-**

**Dr. Veera Pawan Mandavkar**

Assistant professor

Indira Mahavidyalaya Kalamb, Ta- Kalamb,

Dist- Yavatmal Pin-445401

**Available At-**

**http://gurukuljournal.com/**

**Published On Date: 27th Aug, 2016**

# Gurukul International Multidisciplinary Research Journal

## (ISSN 2394-8426) with Impact Factor 2.254

**Calling Papers**

Online Journal
Indexed Journal
Quarterly Journal
Open Access Journal
Peer Reviewed Journal

**Student/ Scholar/ Researcher/ Scientist,**

**Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ - ISSN: 2394-8426)** is an Academic Online 'Open to Use' Peer Reviewed International Journal. GIMRJ is peer reviewed online journal with a key objective to provide the academic, social and industrial community a medium for presenting original cutting edge research papers or work and opens to the world.

**Tentative Schedule**

| Receiving Papers for | Volume – 6 Issue -1 | Volume – 6 Issue -2 | Volume – 6 Issue -3 | Volume – 6 Issue -4 |
|---|---|---|---|---|
| Paper Submission Deadline | 12th March, 2016 | 12th June, 2016 | 12th Sept., 2016 | 12th Dec., 2016 |
| Date of Publication | 2nd April, 2016 | 2nd July, 2016 | 2nd Oct., 2016 | 2nd Jan., 2017 |

**Publication Charges** - Please pay your publication charges & send scan copy of payment sleep.
**One Author – INR 1000 (SAARC Countries) and USD 100 (Others Countries)**
**Two Authors – INR 1600 (SAARC Countries) and USD 160 (Others Countries)**

**For more details : http://gurukuljournal.com/**
**Online paper submission facility is available to submission page.**
**Or submit your paper by mail – info@gurukuljournal.com, mohan.gitte@gmail.com**

### GIMRJ is also inviting proposals for Special Issue (SI) from potential Faculty Members

***Please refer following instructions/ responsibilities,***

*1) Guest Editor is responsible person.*
*2) As the Lead Guest Editor, you need to -*
*1) Promote your Special Issue and invite authors to submit manuscripts with copy right form.*
*2) Make decisions on the acceptance or rejection of manuscripts.*
*3) Cross-check the manuscripts and ensure their quality.*
*4) Have to communicate in your group regarding this SI by either email or any other way.*
*5) You have to collect minimum 10 research papers. Those s hould be able to pay our publication charges.*

***Benefits:***

*As the Lead Guest Editor, you can*
*1) Publish Own Idea's in your Special Issue.*
*2) Get extra rewards based on the number of papers in your SI (May promote to permanent member in editorial Team).*
*3) Receive the Certificate of Honor and a Letter of Thanks when the SI is finished.*
*4) Receive the Certificate of Publication in each participated authors when the Special Issue is finished.*
*5) Your brief bio-data with your photo (Maximum 5 pages) will be published along with your Special Issue.*
*6) Publish 1 paper of Guest Editor for FREE in your SI.*

***Publication Charges** - Please pay your publication charges & send scan copy of payment sleep.*
*One Author - INR 600 (Saarc Countries) and USD 40 (Others Countries)*
*Two Authors - INR 1100 (Saarc Countries) and USD 60 (Others Countries)*


| Managing Editor | Chief Editor | Email Us | |
|---|---|---|---|
| Dr. Prakash N. Somalkar<br>Principal, Gurukul College, Nanda,<br>Tah. Korpana, Dist. Chandrapur.<br>Mo.9422137816 | Mr Mohan Hanumantrao Gitte<br>At. Dattapur, Post. Ghatnandur,<br>Tah. Ambajogai, Dist. Beed.<br>Mo. 9273759904 | info@gurukuljournal.com,<br>help@gurukuljournal.com,<br>mohan.gitte@gmail.com | Scan This QR Code |


**Our Web Portal: http://gurukuljournal.com/**

# Gurukul International Multidisciplinary Research Journal

## (ISSN 2394-8426) with Impact Factor 2.254

**Calling Papers**

Online Journal
Indexed Journal
Quarterly Journal
Open Access Journal
Peer Reviewed Journal

**Student/ Scholar/ Researcher/ Scientist,**

**Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ - ISSN: 2394-8426)** is an Academic Online 'Open to Use' Peer Reviewed International Journal. GIMRJ is peer reviewed online journal with a key objective to provide the academic, social and industrial community a medium for presenting original cutting edge research papers or work and opens to the world.

**Tentative Schedule**

| Receiving Papers for | Volume – 6 Issue -1 | Volume – 6 Issue -2 | Volume – 6 Issue -3 | Volume – 6 Issue -4 |
|---|---|---|---|---|
| Paper Submission Deadline | 12th March, 2016 | 12th June, 2016 | 12th Sept., 2016 | 12th Dec., 2016 |
| Date of Publication | 2nd April, 2016 | 2nd July, 2016 | 2nd Oct., 2016 | 2nd Jan., 2017 |

**Publication Charges** - Please pay your publication charges & send scan copy of payment sleep.
**One Author – INR 1000 (SAARC Countries) and USD 100 (Others Countries)**
**Two Authors – INR 1600 (SAARC Countries) and USD 160 (Others Countries)**

**For more details : http://gurukuljournal.com/**
**Online paper submission facility is available to submission page.**
**Or submit your paper by mail – info@gurukuljournal.com, mohan.gitte@gmail.com**

### GIMRJ is also inviting proposals for Special Issue (SI) from potential Faculty Members

***Please refer following instructions/ responsibilities,***

*1) Guest Editor is responsible person.*
*2) As the Lead Guest Editor, you need to -*
*1) Promote your Special Issue and invite authors to submit manuscripts with copy right form.*
*2) Make decisions on the acceptance or rejection of manuscripts.*
*3) Cross-check the manuscripts and ensure their quality.*
*4) Have to communicate in your group regarding this SI by either email or any other way.*
*5) You have to collect minimum 10 research papers. Those s hould be able to pay our publication charges.*

***Benefits:***

*As the Lead Guest Editor, you can*
*1) Publish Own Idea's in your Special Issue.*
*2) Get extra rewards based on the number of papers in your SI (May promote to permanent member in editorial Team).*
*3) Receive the Certificate of Honor and a Letter of Thanks when the SI is finished.*
*4) Receive the Certificate of Publication in each participated authors when the Special Issue is finished.*
*5) Your brief bio-data with your photo (Maximum 5 pages) will be published along with your Special Issue.*
*6) Publish 1 paper of Guest Editor for FREE in your SI.*

***Publication Charges*** *- Please pay your publication charges & send scan copy of payment sleep.*
*One Author - INR 600 (Saarc Countries) and USD 40 (Others Countries)*
*Two Authors - INR 1100 (Saarc Countries) and USD 60 (Others Countries)*


| Managing Editor | Chief Editor | Email Us | |
|---|---|---|---|
| Dr. Prakash N. Somalkar<br>Principal, Gurukul College, Nanda,<br>Tah. Korpana, Dist. Chandrapur.<br>Mo.9422137816 | Mr Mohan Hanumantrao Gitte<br>At. Dattapur, Post. Ghatnandur,<br>Tah. Ambajogai, Dist. Beed.<br>Mo. 9273759904 | info@gurukuljournal.com,<br>help@gurukuljournal.com,<br>mohan.gitte@gmail.com | Scan This QR Code |


**Our Web Portal: http://gurukuljournal.com/**

# GURUKUL INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

ISSN No. 2394-8426
International Impact Factor 2.254

**Chief Editor**

**Mr. Mohan Hanumantrao Gitte**
At. Dattapur, Post. Ghatnandur,
Tah. Ambajogai, Dist. Beed.
Pin – 431519

**Website**

**http://gurukuljournal.com/**

**Email us**

**info@gurukuljournal.com**
**mohan.gitte@gmail.com**

**Contact us**

**+91 92 73 75 9904**

# Index


| Paper No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 3 | **Personal Profile** | | |
| 4 | दत्त संप्रदायातील बहुमोल ग्रंथ | प्रा.डॉ.सौ. वीरा पवन मांडवकर | 1-4 |
| 5 | स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय कादंबरीतील रंजनवाद | डॉ. पवन मांडवकर | 5-8 |
| 6 | सुरेश भट यांची राष्ट्रीय कविता | प्रा.डॉ.मीनाक्षी दरणे | 9-12 |
| 7 | जाती व्यवस्था आणि समाजसुधारक | प्रा. संगिता वसंतराव घुईखेडकर | 13-16 |
| 8 | **Relationships in Arundhati Roy's Novel 'The God of small things'** | **Prashant S. Jawade** | 17-18 |
| 9 | बालगुन्हेगारी एक सामाजिक समस्या | प्रा. कु. सरोज यादवराव लखदिवे | 19-22 |
| 10 | कळंब तालुक्यातील कोलाम जमातींचे आर्थिक व सामाजिक संरचनेच भौगोलिक अध्ययन | प्रा. एन. व्ही. नरुले | 23-25 |
| 11 | **Silicon as a Basic Building Block of Life: Another Competitor to Carbon** | **K.R. Nemade** | 26-29 |
| 12 | विदर्भातील कृषी उत्पादनाचे अर्थशास्त्र व विपणन | प्रा. माधुरी पं. राखुंडे | 30-32 |
| 13 | **Dye Synthesis from Endophytic Fungi Isolated from *Butea monosperma*** | **K. P. Suradkar[*1] and D.V. Hande[2]** | 33-35 |
| 14 | केळकर समितीचा अहवाल :- समतोल प्रादेशिक विकासाची व्युहरचना | डॉ. अजय व्ही. तागलपल्लेवार | 36-40 |
| 15 | प्राचीन भारतीय नगर रचना | प्रा. एन. आर. ठवळे | 41-43 |
| 16 | शेती पुरक कुटीर आणि लघु उद्योग | प्रा. श्रीमती आर. एम. वाठ | 44-46 |

## परिचय


# डॉ. सौ. वीरा पवन मांडवकर

(पूर्वाश्रमीच्या कु. वीरा पुंडलीकराव डहाळकर)

स्वामिनी अपार्टमेंट, बब्बी पहेलवान चौक, टिळकवाडी, यवतमाळ ४४५००१

दूरध्वनी : ०७२३२–२५२९७५, भ्रमणध्वनी : ९४०३०१४८८५


| | | |
|---|---|---|
| जन्म | : | १८.८.१९७६ (नागपूर) |
| पद | : | सहायक प्राध्यापक, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ |
| शैक्षणिक योग्यता | : | एम.ए. (मराठी), एम.ए. (इतिहास), बी.एड, बी.ए. (अतिरिक्त) समाजशास्त्र व राज्यशास्त्र, पीएच.डी. मराठी – 'संत बहिणाबाई : व्यक्ती आणि वाङ्मय', सेट (मराठी) इतिहास या विषयात (वेगळ्या विदर्भाच्या चळवळीत राजे विश्वेश्वरराव यांचे योगदान) पीएच.डी. प्रबंध सादर |
| संगणक ज्ञान | : | एम.एस.सी.आय.टी. ८८ टक्के (२००८) |
| अन्य | : | १. प्रकाशिका, सेवा प्रकाशन, अमरावती<br>२. संचालिका, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र, कळंब |
| प्रकाशित पुस्तके | : | १. गृहिणींसाठी टॉप टिप्स<br>२. मंजुळवाणे उखाणे<br>३. भुलाबाईची गाणी<br>४. स्वप्नफुले (कथासंग्रह) |
| संपादन | : | १. ओंजळ (प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे सहसंपादन)<br>२. गंधाली (प्रातिनिधिक चारोळीसंग्रहाचे सहसंपादन)<br>३. सिंधू (गौरवग्रंथाचे सहसंपादन)<br>४. दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य (संशोधनपर संदर्भग्रंथाचे सहसंपादन)<br>५. मराठी प्राध्यापक सूची (सहसंपादन)<br>६. संत साहित्य (संशोधनपर संदर्भग्रंथाचे सहसंपादन)<br>७. ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्मयात योगदान – विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत राष्ट्रीय परिषदेची स्मरणिका सहसंपादन |
| शोधनिबंध प्रकाशित | : | आयएसएसएन नॅशनल, इंटरनॅशनल रिसर्च जर्नल व आयएसबीएन संशोधनपर संदर्भग्रंथातून अनेक शोधनिबंध प्रकाशित |

आकाशवाणीवरून प्रसारण : विविध कथांचे आकाशवाणी यवतमाळवरून प्रसारण

अन्य लेखन : अनेक वृत्तपत्रे व नियतकालिकांतून तसेच दिवाळी अंकांमधून कथा, कविता, लेख, शोधनिबंधांसह विविध विषयांवर सातत्याने लेखन

पुरस्कार : आध्यात्मिक सहजसमाधी विश्वविद्यापाठाचा स्त्रीरत्न अलंकाराचार्य पुरस्कार – २००४

अन्य : एनसीसी, शालेय व महाविद्यालयीन स्तरावर विविध खेळांसोबतच हिंदी, संस्कृत, इंग्रजी व मराठीच्या विविध संस्थांमार्फत घेतल्या गेलेल्या परीक्षांमधील यशाची प्रमाणपत्रे, लेखन, गायन व निबंधस्पर्धांची प्रमाणपत्रे, कथ्थक या नृत्यप्रकारात पाच परीक्षा उत्तीर्ण

❖ ❖ ❖

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with*
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
संशोधन शिल्प

# दत्त संप्रदायातील बहुमोल ग्रंथ

**प्रा.डॉ.सौ. वीरा पवन मांडवकर**
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

**प्रस्तावना –**

मराठी भाषेत साहित्यनिर्मितीला बाराव्या शतकापासून प्रारंभ झाला. मुकुंदराज, ज्ञानेश्वर यांनी साहित्यनिर्मितीला प्रारंभ केला. त्यानंतर नामदेव ते एकनाथ या दीर्घ कालखंडात म्हणजेच १८३ वर्षाच्या कालखंडात राजकीय स्थित्यंतरे तर बरीच घडली, पण साहित्याच्या दृष्टीने विशेष भरीव कार्य झाले नाही. समाजातील वर्णाश्रम व्यवस्थेमुळे एक मोठा घटक साहित्य किंवा तत्वज्ञान यापासून दूर होता. 'मोक्षमार्गाचे ज्ञान संस्कृतबद्ध असल्याने विशिष्ट वर्णापुरतेच ते मर्यादित होते. त्यामुळे सर्वसामान्य वर्ग या ज्ञानापासून वंचित होता. समाजातील या वर्गाला आपल्यात सामावून घेणारे, उदात्त तत्वज्ञान सांगणारे बौद्ध, जैन, लिंगायत, नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त यांसारखे विविध धर्मपंथ उदयाला आलेत'.[१] 'इस्लाम अंधारयुग' असे नामाभिधान असणाऱ्या या कालखंडात ज्या काही मोजक्या किरणांचा प्रकाश दिसतो त्यात दत्त संप्रदायाच्या साहित्याचा उल्लेख करावा लागेल.

**बीज शब्द –** दत्त संप्रदाय, ईश्वर, आत्मा, ग्रंथ, पारायण, सोवळे, तत्वज्ञान, परमार्थ

**दत्त संप्रदायाची पार्श्वभूमी –**

दत्त संप्रदायाचे प्रणेते नृसिंह सरस्वतीचा अवतार मोगलांच्या पाशवी आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर झाला. या काळात ब्राम्हण आपल्या निहित कर्तव्यापासून परावृत्त होऊ लागले होते. धर्मासंमत आचार विसरून ब्राम्हण वर्ग आक्रमणकर्त्या मोगलांच्या सेवेत आपली बुद्धी आणि शौर्य नष्ट करू लागला होता. अशावेळी त्या स्वधर्माची जाणीव करून देणारा दत्त संप्रदाय निर्माण झाला. चातुर्वर्ण्य संरक्षणाच्या पौराणिक कल्पनेनुसार दत्तसंप्रदायाची जडणघडण झाली आहे. दत्तात्रेयाच्या उपासनेच्या क्षेत्रात वर्णाश्रमोचित आचारधर्माचे काटेकोर आचरण करणे हा महत्त्वाचा भाग आहे. पूर्वीपासून महाराष्ट्रात दत्ताची पूजा केली जाते. दत्तात्रय देवतेच्या रूपात जरी पुजल्या जात असले, तरी त्यांना विशेष लोकप्रियता श्रीनृसिंहांच्या अवतारामुळे मिळाली. दत्ताची उपासना करणा या संप्रदायाच्या निर्मितीसाठी श्रीनृसिंहाचा अवतार फार प्रेरणादायक ठरला. त्याचप्रमाणे श्रीपाद श्रीवल्लभ यांच्याही प्रेरणेने दत्त संप्रदायाला चालना मिळाली. औदुंबरवाडी, गाणगापूर ही या संप्रदायदाची खास तीर्थक्षेत्रे म्हणून ओळखली जाऊ लागली. दत्तोपासनेचा प्रवाह जरी दत्ताशी सबंधित असला तरीही त्यात इतरही प्रवाह नांदते होते. त्याचे स्वरूप मात्र व्यापक नव्हते. श्रीनृसिंह सरस्वतींच्या अवतारकार्यातून त्याला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. सत्व रज तम या तीन गुणांचे ऐक्यदर्शक व ब्रम्हा विष्णू महेश या त्रिमूर्तींचे एकरूप म्हणून श्रीदत्ताची पूजा केली जाते. इस्लामी आक्रमणाचा धाक आणि मूर्तिभंजनाची टांगती तलवार यांपासून रक्षण होण्यासाठी दत्ताच्या मुर्तीऐवजी पादुकांचे पूजन करण्याची प्रथा दत्त सांप्रदायिकांमध्ये दिसून येते. ईश्वर आणि आत्मा एक असून ज्ञान हेच या आत्म्याचे स्वरूप होय. चैतन्यस्वरूप आत्म्याखेरीज जगाला अस्तित्व असू शकत नाही. असे या संप्रदायाचे तत्वज्ञान आहे. या संप्रदायाच्या आचारधर्मात श्रीदत्तांनी योगमार्ग व सगुणोपासना सांगितली आहे.'दत्तात्रेय ही देवता भारतीयांच्या प्रगल्भ चिंतनाची निर्मिती आहे. भारतीय संस्कृतीतील अत्यत परिणत विचार आणि निगुढ भावना व्यक्त करण्यासाठी इतिहासाच्या गर्भातून हे अद्भुत प्रतिक जन्म पावले आहे. त्यात समग्रता आणि सामंजस्य असल्यामुळे ते सार्वत्रिक श्रद्धेचा विषय बनले आहे.' [२]

**संप्रदायाचे मान्य ग्रंथ –**

गुरूचरित्र, दत्तप्रबोध, दत्तमाहात्म्य आणि गुरूलीलामृत, गीतार्णव हे दत्त संप्रदायातील विशेष मान्यता पावलेले ग्रंथ आहेत. या सर्व ग्रंथात दत्त संप्रदायाविषयी बरीच माहिती मिळते.

**१.गुरूचरित्र –**

दत्त संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचा मानला गेलेला ग्रंथ म्हणजे गुरूचरित्र होय. हिंदू धर्मग्रंथांमध्ये वेदाला ज्याप्रकारचे स्थान आहे, तेच स्थान गुरूचरित्राला दत्त संप्रदायामध्ये आहे. सरस्वती गंगाधर यांनी लिहिलेल्या या ग्रंथाच्या शब्दाशब्दाला मंत्राची योग्यता आहे, असे मानले जाते. या ग्रंथाचा काळ श्रीगुरूंच्या निर्याणानंतर १०० वर्षे म्हणजे शके १४८० असा मानला जातो. सरस्वती गंगाधर यांची मातृभाषा कानडी असूनही बहुसंख्य मराठी भक्तांसाठी उपयोगी ठरावे म्हणून श्रीगुरूंनी मराठी भाषेत हा ग्रंथ लिहिला.

**गुरूचरित्राचे स्वरूप –**

सरस्वती गंगाधर विरचित 'गुरूचरित्रा'चे ५१ अध्याय असून ओवीसंख्या ७४९१ इतकी आहे. या ५२ अध्यायांपैकी अध्याय १ मंगलाचरण, अध्याय २–४ दत्तावतार चरित्र, अध्याय ५–१० श्रीपाद श्रीवल्लभ यांचे अवतार चरित्र आणि अध्याय ११– ५१ श्री नृसिंह सरस्वतींचे चरित्र असून अध्याय ५२ अवतरणिकेचा आहे. तिसऱ्या प्रकरणात गुरूभक्ती आणि प्रसाद हे या ग्रंथाचे प्रमुख विशेष आहेत. दोन दत्तावतारांच्या चरित्राशिवाय प्रसंगानुरूप ब्राम्हणांचा आचारधर्म, गुरूभक्ती, व्रते, तीर्थे असे अनेक विषय सरस्वती गंगाधरांनी हाताळले आहेत. वाङ्मयीन दृष्टीने पाहिल्यास श्रीगुरूचरित्र हा ग्रंथ अत्यंत सरस आहे. त्यात निखळ काव्यस्फूर्ती, कल्पनाविस्तार दिसून येतात. नावीन्य, अद्‌भुतरम्यता, रसरविर्भाव या गुणांनी परिपूर्ण आहे. उपासक इष्टसिद्धीसाठी आणि सामान्य लोक ऐहिक गराजांच्या परिपूर्तीसाठी या ग्रंथाचे पारायण करतात. 'भक्तीमार्गातील अथवा नामस्मरणाच्या मार्गातील स्वकर्मच्युती हा शास्त्रोक्त दोष नाहीसा करून जनतेला स्वकर्मास प्रेरित करून भक्तीप्रवण करण्यासाठी व लोकाच्या ठिकाणी त्याग व निर्भयता उत्पन्न करण्यासाठी गुरूचरित्राचा अवतार आहे.'[३] या ग्रंथाचे पारायण करताना सोवळ्याचे नियम कडकपणे पाळले जातात. अर्थात ही सोवळ्याची वर्णने धर्मच्युत झालेल्या ब्राम्हण समाजाला त्यांच्या धर्माची आठवण करून देण्यासाठी केलेली आहेत. अन्यथा 'अंत:करण असता पवित्र, सदाकाळ वाचावे गुरूचरित्र' असे म्हणून ठेवले आहे.

**२. दत्तप्रबोध –**

'दत्तप्रबोध' हा ग्रंथ अनंतसुत विठ्ठलबोवा उर्फ कापडीबोवा यांनी शके १७८२ चैत्र शुद्ध १ मध्ये लिहिला. ६१ अध्याय असलेल्या या ग्रंथात १४२३६ ओवीसंख्या आहे. अनंतसुत विठ्ठल हे आश्वलायन शाखीय भारद्वाज गोत्री ऋग्वेदी ब्राम्हण. पित्याचे नाव अनंत आणि मातेचे नाव राधा. 'अनंतसुत हे एकनाथाच्या निंबराज परंपरेतले. त्यांची गुरूपरंपरा आदिनारायण–हंस–विधी–अत्री–दत्तात्रेय–जनार्दन–एकनाथ–नरहरी–निंबराज–शिवराम–जयराम–नारायण–अनंत–अनंतसुत विठ्ठल अशी आहे.'[४] या ग्रंथाचा प्रारभ इंदूर येथे झाला. या ठिकाणी ४० अध्याय लिहून झाल्यावर बडोदे येथे उर्वरित लिखाण पूर्ण करण्यात आले. अनंतराव कुलकर्णी हे परशुरामक्षेत्राजवळील पिंपळगावचे जोस कुळकर्णीपण करीत. अनंतराव यात्रेस गेले असता राधेने विष्णूपदी देह ठेवला. नंतर प्रयाग येथे अनंतरावांनी संन्यास घेतला. दत्तप्रबोधाच्या ६१ अध्यायांपैकी अध्याय १ते ३५ दत्तावतार चरित्र अध्याय, ३६ ते ५० मत्स्येंद्र गोरक्षादी दत्तसंबंधित सिद्धांच्या कथा आणि अध्याय ५० ते ६१ जनार्दन निंबराज या ग्रंथकारांच्या गुरूपरंपरेतील सत्पुरूषांच्या कथा अशी विभागणी केली आहे.

हृदयभुवनी श्रीदत्त । प्रगटुनी वदविला ग्रंथ ।। अशा भावनेने ग्रंथकाराने हा ग्रंथ लिहिलेला आहे. यातील तत्त्वज्ञान हे कथानिवेदनाच्या ओघात प्रसंगाप्रसंगाने येत असल्याने त्यात रजकपणा निर्माण झाला आहे. दत्त संप्रदायाचे सैद्धांतिक अध्ययन या ग्रंथातून पहावयास मिळते.

सत्य ब्रम्ह सनातन । तेचि विस्ताराने परिपूर्ण।।
पदार्थ मात्र नसे त्याविण । अधर्म धर्माधर्म ।।
कृत्य अकृत्यादि वर्म । आगम निगम तोचि की ।। (दत्तप्रबोध २८–१९२–१९७)

**३. श्रीगुरूलीलामृत –**

'श्रीगुरूलीलामृत' हा ग्रंथ वामनबोवांनी लिहिला. वामनबोवांचा जन्म अहमदनगर प्रसिद्ध वैद्य घराण्यात त्याचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रावजी व आईचे नाव अहिल्या होते. या ग्रंथाचे ५५ अध्याय असून ओवीसंख्या ९७५७ आहेत.

अक्कलकोटच्या स्वामींचे चरित्र या ग्रंथात आलेले आहे. स्वामींचे अवतारूप दर्शविण्यासाठी अनेक चमत्कारांचा आधार घेतला आहे. श्रीगुरूलीलामृततही प्रसंगाप्रसंगाने दत्तसंप्रदायाचे तत्वज्ञान उलगडून दाखविले आहे.

'तो परमेश्वर जरी करी कृपा। संसार परमार्थ जरी सोपा।
होय निश्चयात्मक सहज बापा। शिष्या धरी रे मानसा।
बहुत जन्मांचे पूर्वार्जित। ईश्वरार्पण निष्काम सुकृत।
असता निरामय धूतचित। तरीच परमात्मकृपा होय।। (श्रीगुरूलीलामृत १३.३० –३६)

वामनबोवांनी अत्यत रसाळपणे आणि यथार्थपणे हे तत्वज्ञान मांडले आहे. परमेश्वराच्या कृपेने संसार परमार्थ सोपा होईल, असा त्यांना विश्वास आहे. भाविकांच्या मनातील भोळा सात्विक भाव शुद्ध मन, काम, क्रोध, द्वेषविरहित अंत:करण हेच सर्व ईश्वराच्या भक्तीसाठी महत्वाचे आहे. भक्त उच्च जातीतील असो की नीच जातीतील. ज्ञानी असो की मंदमती. त्याला भगवद्भक्ती ही गोडच वाटते. ईश्वरोपासनेत त्याचे मन रमते. अशांना ईश्वरही प्रत्यक्ष दर्शन देत असतो. अशाप्रकारे शुद्धभावाचे महत्त्व वामनबोवा आपल्या गुरूलीलामृत ग्रंथात विशद करतात.

**४. दत्तमाहात्म्य –**

'दत्तमाहात्म्य' हा ग्रंथ श्रीवासुदेवानंद सरस्वती यांनी लिहिलेला आहे. या ग्रंथाचा काल शके १८२३ मानण्यात येतो. या ग्रथात ५९ ओव्या असून ५५१३ ओवीसंख्या आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे की स्वामींनी हा ग्रंथ आधी संस्कृतात लिहिला होता. नंतर त्यांना जाणवले की या ग्रंथातले तत्वज्ञान संस्कृतानभिज्ञ लोकांनाही समजणे आवश्यक आहे. त्यांनी म्हणूनच या ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले. आपला हाच उद्देश व्यक्त करताना ते म्हणतात.,

'विविध धर्मान्वित । ज्ञानभक्तीरसभरित ।
असे हे दत्तचरित्र । मूर्तिमंत ब्रम्ह की ।।
ब्रम्ह ते अरूप असूनं । कोणा न ये दिसून ।।
करिता उपनिषदांचे श्रवण । मनन ध्याने मग कळे ।।
मंदा विशेषेकरून । नुमजे औपनिषद ज्ञान ।।
त्याकरिता हे लेखन । करवी अत्रिनंदन दयाळू ।।' (दत्तमाहात्म्य १५–१०४–१०६)

उपनिषदांचे श्रवण, मनन, अध्ययन करूनही काहींना ब्रम्हस्वरूप समजू शकत नाही. श्रीदत्तचरित्र हे मूर्तिमत ब्रम्हस्वरूप आहे. म्हणून श्रीदत्तचरित्राचे अध्ययन केल्यावर मंदमतीलाही ज्ञानप्राप्ती होते, असा विश्वास श्रीवासुदेवानंद सरस्वती यांनी व्यक्त केला आहें. या ग्रंथातून तत्त्व विवेचन करताना ग्रंथकार म्हणतात, 'सर्वव्यापी, अव्यय, अनंत, आनंदरूप असे आत्मस्वरूप आहे. या अवस्थेप्रत जाण्याकरिता ईश्वरार्पण बुद्धीने केलेली निष्काम कर्मे बुद्धीचा मलहरण करून ईश्वरविषयक गोष्टीची आवश्यकता निर्माण करतात. असे या ग्रंथाचे तात्त्विक सार आहे.

**५. गीतार्णव –**

दत्तसंप्रदायातील एक महत्त्वाचे ग्रंथकार म्हणजे दासोपंत उर्फ दासो दिगंबर होय. दासोपंत हे अंबेजोगाईला राहात. ऐन तारुण्यात विरक्ती आल्यामुळे ते अध्यात्माकडे वळले. बारा वर्षाच्या तपश्चर्येनंतर त्यांना श्रीदत्ताचा साक्षात्कार झाला, असे म्हटले जाते. त्याचा लेखनाचा झपाटा प्रचड होता. त्यांनी शंभराच्यावर ग्रंथ लिहिले. त्यापैकी 'गीतार्णव' हा सव्वा लाख ओव्यांचा ग्रंथ महाग्रंथ म्हणून पाहिला जातो. इतकी अफाट ओवीसंख्या असल्याने तो खरोखर साहित्यातील अर्णव म्हणजे सागर वाटतो. मराठीत इतका प्रचंड ग्रंथ कोणताच नाही. तरीही यातील पूर्ण ओव्या प्रसिद्ध झालेल्या नाहीत. केवळ १२०५५ इतक्याच ओव्या यात प्रकाशित झाल्या आहेत गंथाचे वाचन केल्यास त्यातून दासोपंतांची विद्वत्ता दिसून येते. पण श्रोत्यांच्याबद्दलची बेफिकीर आणि फटकळ वृत्ती यामुळे हा ग्रंथ काहीसा विद्वज्जड झालेला आहे. संपूर्ण ग्रंथात विविध वेदांती कल्पना आणि सिद्धांत यामुळे हा ग्रंथ सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेरचा होतो. काव्याचा काहीसा अभाव असल्यामुळे हा ग्रंथ सामान्याना दुर्बोध वाटू शकतो. प्रारंभी दत्तात्रयाला वंदन करून हा ग्रंथ लेखनास प्रारभ केला आहे. यातील तत्वज्ञान हे स्वानुभवातून निर्माण केले गेले आहे. इतरांच्या भाष्याचा आधार त्यासाठी घेतलेला नाही. असे त्यांनी सुरुवातीला सागितले आहे. सगुणाच्या पूजेमुळे

उपासनेला बाधा येते, मोक्षाला उणेपणा येतो, असे दासोपंतांचे म्हणणे आहे. अनेकदा त्यांच्या रचनेत विचाराची पुनरुक्ती झालेली दिसते.आपल्या ग्रंथरचनेतून आणि पदरचनेतून अंत:शुद्धीचा, भक्तीचा आणि नीतीचा संदेश दासोपंतांनी दिला आहे. अफाट आणि सुबोध रचना हे त्यांचे वैशिष्ट्य. वाङ्मयीन मूल्यापेक्षा त्याचे आध्यात्मिक मोल मोठे आहे.'[५] तरीही मराठीत इतक्या मोठ्या प्रमाणात ओव्यांनी युक्त असा ग्रंथ दुसरा कोणताही नाही. म्हणूनच दत्तसंप्रदायातच नाही तर संपूर्ण मराठी भाषेत या ग्रथाचे महत्त्वाचे स्थान आहे.

अशाप्रकारे हे पाचही ग्रंथ अत्यंत उत्कटपणे दत्तसंप्रदायाचे तत्त्वज्ञान मांडताना दिसतात.

**निष्कर्ष –**

१. परकीय आक्रमणात स्वधर्माला आणि धर्मसंमत कर्तव्यांना विसरलेल्या ब्राम्हणांना कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी दत्त संप्रदायाची निर्मिती झाली आहे.
२. दत्तसंप्रदायात इस्लामी अंधारयुगाला प्रकाशित करणारे साहित्य निर्माण झाले.
३. इस्लामी आक्रमणाचा धाक आणि मूर्तीभंजनाची टांगती तलवार यांपासून रक्षण होण्यासाठी दत्ताच्या मुर्तिऐवजी पादुकांचे पूजन करण्याची प्रथा दत्त सांप्रदायिकांमध्ये दिसून येते
४. गुरूचरित्र, दत्तप्रबोध, दत्तमाहात्म्य आणि गुरूलीलामृत, गीतार्णव हे दत्त संप्रदायातील विशेष मान्यता पावलेले ग्रंथ आहेत.
५. हिंदू धर्मग्रंथांमध्ये वेदाला ज्याप्रकारचे स्थान आहे. तेच स्थान गुरूचरित्राला दत्त संप्रदायामध्ये आहे.
६. श्रीगुरूलीलामृतातही प्रसंगाप्रसंगाने दत्तसंप्रदायाचे तत्त्वज्ञान उलगडून दाखविले आहे.
७. दत्तमाहात्म्य या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे की श्रीवासुदेवानंद सरस्वती हा ग्रंथ आधी संस्कृतात लिहिला होता. नंतर त्यांना जाणवले की या ग्रंथातले तत्त्वज्ञान संस्कृतानभिज्ञ लोकांनाही समजणे आवश्यक आहे. त्यांनी म्हणुनच या ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले.
८. दासोपंत उर्फ दासो दिगंबर याचा 'गीतार्णव' हा सव्वा लाख ओव्यांचा ग्रंथाचा उल्लेख महाग्रंथ म्हणून केला जातो. इतकी अफाट ओवीसंख्या असलेला प्रचंड ग्रंथ मराठीत दुसरा कोणताच नाही.

**संदर्भ –**

१. आवलगावकर, डॉ.अ.वा, 'श्री गोविंदप्रभुविषयक साहित्य : व्याप्ती आणि स्वरूप', *गोविंदप्रभुविषयक साहित्य शोध आणि समीक्षा*' चंद्रकला प्रकाशन, पुणे १९९६, पृ. ११
२. ढेरे, रा. चिं., दत्तावताराचे रहस्य, '*दत्त संप्रदायाचा इतिहास,*' पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. १०
३. नसिराबादकर. ल.रा, 'नाथपूर्वकालीन साहित्य', *प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७ सहावी आवृत्ती, पृ. ९५
४. ढेरे, रा. चि., 'दत्त संप्रदायाचे स्वरूप' '*दत्त संप्रदायाचा इतिहास,*' पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. १७२
५. नसिराबादकर. ल.रा, 'नाथपूर्वकालीन साहित्य', *प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७ सहावी आवृत्ती, पृ. ९८

**संदर्भग्रंथ –**

१. कोलते, वि.भि., *प्राचीन मराठी साहित्य संशोधन*, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, १९६८.
२. गोसावी, ल.रा., *पाच भक्तिसंप्रदाय,* मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७३.
३. जोग, रा.श्री., *मराठी वाङ्मयाचा इतिहास*, खंड तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७३
४. भावे, वि.ल., *महाराष्ट्र सारस्वत*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती, १९८२
५. शेणोलीकर, ह.श्री., *प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप,* मोघे प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती, १९८७

❖❖❖

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with*
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
संशोधन शिल्प

# स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय कादंबरीतील रंजनवाद

**डॉ. पवन मांडवकर**
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद

**सारांश**

वैदर्भीय कादंबरीकारांकडे मराठी साहित्यात तसे दुर्लक्षच झालेले आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या निमित्ताने तयार होणाऱ्या कादंबऱ्यांची जागा सुखासीनतेकडे झेपावणाऱ्या रंजनवादी कादंबऱ्यांनी घेतली. फडके, खांडेकर, माडखोलकरांनी रंजनवादाला प्रभावीपणे चित्रित केले आणि विदर्भातील अन्य साहित्यिकांनीही तो मार्ग स्वीकारला. कादंबरी विश्वावर फडके तंत्राची छाप दिसते. कथानकापासून मांडणी, विकास सर्वच बाबतीत बऱ्याच प्रमाणात अनुकरण असून 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळला गेला. नायक–नायिकेची भेट–ओळख–प्रेम–भेटीगाठी–वाद –ताटातूट–विरह–पुनर्मिलन हा मार्ग रुळलेला दिसतो. आदि–मध्य–अंत याच पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र दिसते. काही लेखकांनी अपवादात्मक मोजक्या कादंबऱ्यांचा शेवट दु:खाचा केला आहे. विस्तारभयास्तव येथे सुमती धनवटे, मा.ना. भोळे, लीला देशमुख, श्रीकांत राय, उद्धव शेळके, दुर्गा जोशी आणि माडखोलकर इत्यादींच्या रंजनवादी कादंबऱ्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. समाजाला विरंगुळा हवा होता आणि हीच नस पकडून रंजनवादी कादंबऱ्यांची निर्मिती होत गेली.

**बीजशब्द**

कादंबरी, रंजनवाद, वाचकप्रिय, स्वातंत्र्योत्तर, साठपूर्व

**प्रस्तावना**

वैदर्भीय कादंबरीकारांकडे मराठी साहित्यात तसे काही प्रमाणात दुर्लक्षच झालेले आहे. त्यातही स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडात बा.सं. गडकरी, ग.त्र्यं. माडखोलकर, पु.भा. भावे, डॉ. य.खु. देशपांडे, न.र. फाटक, शं.बा. शास्त्री, वाळके, बकुलराय, अनंत गोपाल शेवडे, कोलारकर, दिनकर देशपांडे, या.मु. फाटक, वनमाली, मुक्तिबोध, वसंत वरखेडकर, शरच्चंद्र टोंगो, पां.श्रा. गोरे, केशव केळकर, गो.नी. दांडेकर, सीता ब्रम्ह, उद्धव शेळके, आगाशे, तल्हार, बोरसे, गीता साने, लीला दीक्षित, लीला देशमुख, रामदास सेलूकर अशी अनेक मातब्बर साहित्यिक मंडळी असूनही तत्कालीन कादंबऱ्यांचा संशोधनपर अभ्यासही फारसा झाला नाही. या कादंबऱ्यांचे विषय आणि प्रवाह विभिन्न आणि विपुल होते. शोधनिबंधाच्या आवाक्याचा विचार करता येथे केवळ रंजनवादी कादंबऱ्यांचे अध्ययन केले आहे आणि त्यातही निवडक कादंबऱ्यांवरच प्रकाश टाकण्यात आला आहे.

**मराठी कादंबरीतील रंजनवाद**

हरिभाऊंच्या कालखंडातच ना.सी. फडक्यांनी आणि खांडेकरांनी कादंबरी लेखन सुरू करून समाजाभिमुख प्रश्ननिष्ठ कादंबरीकार वा.म. जोशी, केतकर, वरेरकर यांच्यापेक्षा वेगळा प्रकार हाताळून अल्पावधीतच हरिभाऊंसह या सर्वांपेक्षा अधिक लोकप्रियता मिळवली. समकालीन वाचकांच्या आवडीनिवडी आणि सुखासीन कादंबरीकडे तरुणांचा ओढा लक्षात घेऊन फडके, खांडेकर, माडखोलकर अशा कादंबरीकारांनी लेखन केले. जीवनातील दु:खाला कंटाळून कल्पनाविश्वात रमणाऱ्या सुशिक्षित तरुण वाचकांची नस या साहित्यिकांनी अचूक पकडली. नायक–नायिकांच्या भेटीगाठी, ओळख, सहवास, मैत्री, यातून निर्माण होणारे प्रेम, कधी भांडणे, विरह, पुनर्भेटी अशी वर्णने वाचकांना मोहविणारी होती. कधी रहस्य, संकट, साहस, योगायोग, सुटका यांचीही त्यात पेरणी असायची. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही क्रांतिकारकांचे आदर्श डोळ्यापुढे असल्याने अनेक रंजनवादी कादंबऱ्यांमध्ये हे विषय किंवा पात्र निर्माण करण्यात आले. तारुण्य, प्रेम, शृंगार, प्रणय अशा विषयांना रंजकतेने वर्णिल्याने या कादंबऱ्या नव्या पिढीला आकर्षित करीत होत्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात एक लढाई संपून समाधानाचे आयुष्य काढण्याची स्वप्ने पाहणाऱ्या समाजाला विरंगुळा हवा होताच आणि तो या रंजनवादी कादंबऱ्यांनी मिळवून दिला.

**विषय विवेचन**

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पहिल्या तपात विदर्भातीलच नव्हे तर एकंदर मराठी कादंबऱ्यांवर फडके तंत्राची छाप दिसते. अगदी कथानकापासून मांडणी, विकास सर्वच बाबतीत बऱ्याच प्रमाणात अनुकरण दिसते. 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळला गेला आहे. नायक–नायिका भेट–ओळख–प्रेम–भेटीगाठी–वाद–ताटातूट–विरह–पुनर्मिलन या रुळलेल्या नियमित मार्गावरून कथानके वाटचाल करताना दिसतात. आदि–मध्य–अंत याच पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र तेथे दिसते. काही लेखकांनी अपवादात्मक मोजक्या कादंबऱ्यांचा शेवट दु:खाचा केला आहे. मात्र ते दु:ख वरवरचे वाटते आणि त्याचा सखोल परिणाम वाचकांवर होत नाही. स्वप्रतिभेचे दर्शन घडविण्याची किमया या काळात लेखकांना साकार करता आली नाही की त्यांनी त्याची चाचपणीच केली नाही, असा प्रश्न पडतो.

तारुण्यसुलभ प्रेमाला वाहिलेली या काळातील मा.ना. भोळे यांची एक रंजनवादी सुखान्तिका 'दुनिया'. ह्या कादंबरीचा नायक हा त्याच्या वडिलांचा एकुलता एक मुलगा. सर्व खेळांत निष्णांत. नायक–नायिकेच्या प्रथम भेटीत एकमेकांकडे आकर्षित होणे, प्रत्येक खेळात ते दोघे एकमेकांचे सहयोगी खेळाडू म्हणून निवडले जाणे, नायकाचा आकर्षक खेळ आणि त्यापेक्षाही त्याचा भरीव बांधा नायिकेला आवडणे, त्यांच्यामध्ये निर्माण होणारी एकमेकांविषयी आसक्ती, मध्येच नायिकेला स्वत:च्या ध्येचाची आठवण होणे, मग 'प्रेम की ध्येय' हा संघर्ष, त्यातून विकल्प, नायकाचे परागंदा होणे, त्यानंतरच्या काळात दोघांनाही एकमेकांवर असलेल्या प्रेमाची महती पटणे आणि पुन्हा त्यांचे मिलन होणे अशा रुळलेल्या मार्गावरून ही कादंबरी प्रवास करते. या कादंबरीत नायक–नायिकेच्या प्रेमप्रकरणात घरच्यांची किंवा समाजाची आडकाठी नसते. घरातील व सभोवतालची परिचित मंडळी त्या दोघांचे भले व्हावे, याचसाठी प्रयत्नशील दिसतात. एकमेकांच्या मनातील शंका–कुशंका हाच काय तो प्रेमातील अडसर. वास्तव जीवनाशी या कादंबरीची तुलना तशी कठीणच जाते.

सामान्यांच्या जीवनापासून दूर गेलेली रंजनवादी कादंबरी 'वादळज्योत'. 'समाजात अन्यायाच्या जात्याखाली ज्या स्त्रिया भरडल्या जात आहेत, त्यांच्याकडे सहानुभूतीच्या नजरेने पाहिलं जावं, असा उद्देश बाळगून ही कादंबरी लिहिली आहे.'[१] असे लेखिका सुमती धनवटे स्वत: म्हणत असल्या तरी याच कादंबरीत 'बकुळेच्या जीवनावर कादंबरी लिहिता आली तर? .....तर खात्रीनं ती एक स्वप्नरम्य कादंबरी होईल.'[२] असेही लेखिकेने कथानकात म्हटले आहे. लेखिकेच्या मनातील भावप्रतिमा या कादंबरीत ठिकठिकाणी जाणवतात. पतीच्या प्रेमासाठी आसुसलेली आणि संसारसुखासाठी धडपडणारी बकुळा, कठोर हृदयाचा तिचा पती बापूसाहेब, तसेच प्रेमळ व्यक्तिरेखा अनंत दीक्षित अशा त्रिकोणातून ही कादंबरी फडके तंत्राचाच वापर करते. सुरुवातीची प्रकरणे आकर्षित करणारी, वाचकांना गुंतवणारी, पुढे बहरत गेलेली प्रेमकथा, निरगाठ–सुरगाठ–उकल या पद्धतीने कथानकाला फुलवत ठेवणे हे तंत्र आणि मोहक शैलीमुळे ही कादंबरी वैदर्भीय रंजनवादी कादंबऱ्यांमध्ये उठून दिसते.

या कादंबरीपूर्वी लेखिकेने लिहिलेल्या 'जय–पराजय' या कादंबरीतही नायक–नायिकेचे एकमेकांजवळ येणे, विभक्त होणे आणि पुनर्मिलन हाच मार्ग अनुसरला आहे. नायिका मर्यादाशील तर नायक बेछूट, स्वैराचारी, त्यातून निर्माण होणारे भावनिक, वैचारिक संघर्ष आणि शेवटी नायकाचे मतपरिवर्तन ही कथानकाची मांडणी आकर्षक आहे.

'मी एकटीच जाणार' ही लीला देशमुखांची वैद्यकीय पेशाची पार्श्वभूमी लाभलेली ही एक प्रेमकथा. 'स्त्रीने वाटेल तसे कष्ट उपसावे अन् थोडं स्वास्थ्य मिळतात पुरुषाची फुलपाखरी वृत्ती बाहेर भटकू लागावी, हे खरोखर आजच्या सुशिक्षित स्त्रीच्या संसाराचं स्वरूप आहे. बरोबरीची बुद्धिवान, ध्येयवादी स्त्री आजच्या पुरुषाची ही फुलपाखरी वृत्ती अजमावून घ्यायला असमर्थ ठरली आहे'[३], हे सांगण्याच्या उद्देशाने या कादंबरीची रचना केली गेली आहे. लीला देशमुखांच्या कादंबऱ्यांवर फडक्यांच्या शैलीची छाप असून कलावादाकडे व रंजनवादाकडे त्यांचा झुकता कल आहे. स्वप्नमय आभासात्मक विश्वात त्यांच्या नायक–नायिका वावरत असतात.

'वीस दिवस' ही श्रीकांत राय म्हणजेच श्रीकांत नारायण आगाशे यांची प्रेमविषय साकारणारी कादंबरी. माहेरी गेलेल्या पत्नीच्या विरहाने तंद्री लागलेला नायक अपघाता सापडून वेडा होतो. पत्नीला बातमी नीट न कळल्याने तिच्या हृदयाची तगमग होते. केवळ वीस दिवसांचा हा नियतीचा खेळ दाखवताना लेखकाने कादंबरीचा प्रवाह खेळकर ठेवला आहे. पत्नीप्रेमाची कथा असली तरी वेड्यांचे अनुभव अतिशय दर्जेदारपणे वर्णिले आहेत.

वाचकप्रिय आडाखे जवळ करीत एखादा लेखक आपल्या दमदार कथानकाचे कसे हाल करून घेतो त्याचे उदाहरण म्हणजे उद्धव शेळक्यांची कादंबरी 'नांदतं घर'. घरात दारिद्र्य असूनही यशवंताचे अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष, त्याचा सिनेमाचा नाद, शालूचे प्रेमप्रकरण आणि त्यातून उद्भवणारे संकट, वडील मुलाचे वेगळे होणे हे मध्यमवर्गीयांच्या जीवनातील सुखदु:खाचे चित्रण वास्तविकतेला जवळ करून प्रभावीपणे मांडता आले असते; परंतु आरंभ–विकास–उत्कर्षबिंदू–उकल हे सूत्र वापरून मुद्दाम ओढून ताणून निर्माण केलेला आनंददायी शेवटाकरिताचा खटाटोप पाहता उद्धव शेळक्यांची ही कादंबरी केवळ रंजनवादातच अडकून पडली, हे लक्षात येते.

दुर्गा जोशी यांच्या 'दिव्य ज्योती'मध्ये सविता, सरिता या प्रमुख व्यक्तिरेखा असून इंग्रजांच्या क्रूर अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर अत्याचारग्रस्तांच्या बाबतीत असलेली दयाबुद्धी उठून दिसते. मात्र १९४२ ते १९४५ या धगधगत्या कालखंडातील विदारक घटनांचा उल्लेख करण्यापलीकडे या कादंबरीत केवळ स्वप्नरंजन आहे. बंगालमधील दुष्काळाचे वर्णन आहे; मात्र ते प्रभावी वाटत नाही. मोठ्या राजकीय घटनांनी युक्त परंतु परिणामशून्य अशी ही कादंबरी आहे.

'रविवार ते रविवार' ही शरच्चंद्र टोंगोंची कादंबरी बाळबोध कथानकसंपन्न वाटते. 'अखेरची इच्छा'मधील कथानक सरळ आहे. लेखिका—मैत्रिणीला दिलेला नकार कलाकुशलतेने टोंगोंनी वर्णिला आहे.

गो.नी. दांडेकरांच्या कोकणाची पार्श्वभूमी असलेल्या 'शितू' या कादंबरीत विसूवरील शितूचे अमर प्रेम वर्णिले आहे. त्यांच्या 'माचीवरला बुधा' या कादंबरीत लेखकाने निसर्गवर्णनाबरोबरच प्रचंड कल्पनाविश्व निर्माण केले आहे. त्यांच्या कादंबऱ्या प्रादेशिक व सामाजिक स्तरात मोडत असल्या तरी त्या रसिकांच्या रंजनात कुठलीही कमतरता भासू देत नाहीत.

ग.त्र्यं. माडखोलकरांच्या 'स्वप्नांतरिता', 'अनघा', 'अरुंधती', 'रुक्मिणी' या चारही कादंबऱ्या नायिकाप्रधान असून त्याच त्या गोष्टींचा पुन:प्रत्यय येतो. समकालीन राजकारणाचे व्यापक चित्रण, क्रांतिकारकांविषयी आत्मीयता आणि उग्र शारीरिक प्रेम हे त्यांच्या कादंबऱ्यांचे विशेष. कादंबरीच्या कथानकाशी किंवा एकंदर प्रकृतीशी राजकारणाचा मेळ बसतो की नाही याचा विचार न करता त्यांनी हे लिखाण केले आहे. 'रुक्मिणी'मध्ये उत्तरार्धात जे राजकारण आले आहे, ते कथानकाशी ठिगळवजा जुळले आहे की काय असे वाटते. 'आरंभीचे भाग चटका लावणारे व कथानकाला ओघ देणारे असले तरी नंतरचा बराचसा भाग आगंतुक वाटतो किंवा कदाचित 'राजकीय कादंबरीकार' हे आपले लौकिकप्राप्त व्यक्तिमत्त्व लेखकाला विसरावेसे वाटत नसल्यामुळेही असे झाले असावे.'[४] अशीच काहीशी बाब 'अनघा'ची. या कादंबरीत प्रेमकथा आहे. तिला राजकारणाची पार्श्वभूमी आहे. डॉ. अनघा यांचा कम्युनिस्टांकडे ओढा असून त्या डॉ. अभय यांच्याशी सतत चर्चा करीत असतात असे लेखक सांगतात. म. गांधींच्या हत्येनंतर त्याचे घर उद्ध्वस्त केले जाते. असे काही राजकीय प्रसंग विस्ताराने वर्णिले आहेत. 'स्वप्नांतरिता' कादंबरीत राजीव देशपांडे हा क्रांतिकारक नायक आणि नयिका रंजन यांच्या प्रेमाची कहाणी आहे. मात्र या कथानकाला भारताच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील काही राजकीय घडामोडींची पार्श्वभूमी आहे. 'अरुंधती'मध्ये चित्रित केलेल्या नायिकेला पुरुषांचे भय वाटत नाही, उलट आकर्षण वाटते. अनंग देशमुख या कम्युनिस्ट कार्यकर्त्याला नायक दाखवून त्याच्या सहवासात नायिकेच्या स्त्रीविषयक भावना जागृत होतात, अशी प्रेमकहाणी माडखोलकरांनी चित्रित केली आहे.

या चारही कादंबऱ्यांमध्ये भरपूर राजकारण आले असून विरंगुळा किंवा मनाला तजेला आणण्यासाठी तर प्रेमाची पेरणी केली नाही ना, असा प्रश्न पडतो. काही वेळा हे प्रेम भडक, कामुक, उत्तेजक, वाचकांच्या भावना चाळवणारे वाटते. 'अरुंधती'मध्ये एक प्रसंग आहे. — 'रात्र बरीच झाली आहे. आपण आत जाऊन निजू आता—' तिचे ते शब्द कानावर पडले मात्र — तो झटदिशी उठला. त्याने तिच्या केसाची झुलपे धरून तिचे तोंड वर उचलले. तिची लहान, पातळ जिवणी आपल्या किंचित रूंद, जाड जिवणीत घट्ट धरली आणि क्षणार्धात त्याचा धूम्रगंधित गरम श्वास तिच्या श्वास तिच्या सौम्य, स्वच्छ श्वासात मिसळला.' (अरुंधती, पृ. १२७) याच कादंबरीत दुसरा प्रसंग उदाहरणादाखल देता येईल. — 'रमणभाई लोडाला ओठंगून बिछान्यावर लेटलेले होते व त्यांच्या त्या मोठ्या थोरल्या पलंगावर त्यांना अगदी बिलगून अरुंधती बसलेली होती. तिचा हात आपल्या गालावर ठेवून ते तो कुरवाळीत होते. तिच्या अंगातल्या पांढऱ्या चोळीच्या बाहीपासून तो तळव्यापर्यंत तो उघडा गोंडस हात, आपल्या आखूड, गुबगुबीत बोटांनी हळूहळू दाबण्याचा त्यांचा क्रम, डोळे अर्धवट मिटून, सारखा चालू होता. मधून मधून तिच्या करांगुलीचे अग्र ते आपल्या जिवणीच्या बळावर हळूच दाबीत व मधूनच एखादे वेळी चोळीच्या पोकळ बाहीत आपली बोटे अलगद शिरकावून तिच्या दंडाच्या मांसल भागात ती अगदी हळुवारपणे रोवीत.' (अरुंधती, पृ. ८५) असे भावना चाळवणारे लेखन या रंजनवादी कादंबरीत माडखोलकरांनी केले आहे.

याच काळात लीला दीक्षितांची 'मधुबोल', गो.सं. गिरटकरांची 'पावना', द.चि. सोमणांची 'वाड्यांच्या वाड्यात', ह.चि. दातारांची 'मशाल', द.ग. प्रधानांची 'जीवनप्रवाह' अशा अनेक कादंबऱ्यांनी वाचकांचे रंजन करणे हेच ध्येय आखल्याचे जाणवते. सुरुवातीला जरी वेगवेगळ्या समस्यांची पार्श्वभूमी सादर करून किंवा एखाद्या समस्येच्या निराकरणासाठी लेखन केल्याचा भास निर्माण केल्या गेला तरी शेवटी या कादंबऱ्या रंजनवादाच्या वर्तुळातच फिरत राहिल्या, असे म्हणावे लागेल.

असे असले तरीदेखील या कालखंडातील वैदर्भीय रंजनवादी किंवा करमणूकप्रधान कादंबरीने वाचकांचे रंजन करताना जीवनाची साथ सोडली नाही, हे वैशिष्ट्य नाकारता येणार नाही. प्रेम चित्रण ही रंजनवादी कादंबरीची प्रवृत्ती असली तरी ही कादंबरी सहसा थिल्लर पातळीवर जात नाही. गांभीर्यपूर्वक प्रेमविषयक सर्व संभवनीय पैलूंचा विचार साहित्यिकांनी केलेला आहे. तारुण्यसुलभ अवखळपणाबरोबरच वैचारिकतेलाही प्राधान्य दिल्याने लेखकांचा प्रगल्भपणा मान्य करावा लागतो.

**निष्कर्ष**

१. स्वातंत्र्योत्तर काळात समकालीन वाचकांच्या आवडीनिवडी आणि सुखासीन कादंबरीकडे तरुणांचा ओढा लक्षात घेऊन फडके, खांडेकर, माडखोलकर अशा कादंबरीकारांनी लेखन केले. जीवनातील दुःखाला कंटाळून कल्पनाविश्वात रमणाऱ्या सुशिक्षित तरुण वाचकांची नस या साहित्यिकांनी अचूक पकडली.

२. 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळून नायक–नायिकेची भेट–ओळख–प्रेम–भेटीगाठी–वाद–ताटातूट –विरह–पुनर्मिलन हा मार्ग तसेच आदि–मध्य–अंत याच पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय रंजनवादी कादंबरीचे दिसते.

३. वाचकप्रिय आडाखे जवळ करीत काही लेखकांनी आपल्या दमदार कथानकाचे मातेरे करून घेतले. राजकारण वर्णनाचा मोह न आवरता आल्याने त्याला पुढे करून विरंगुळा किंवा मनाला तजेला आणण्यासाठी तर प्रेमाची पेरणी केली नाही ना, असा प्रश्न काही कादंबऱ्यांच्या बाबतीत पडतो.

४. स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी आणि कम्युनिस्टांचा, क्रांतिकारकांचा आदर असल्याने काही कादंबरीकारांनी त्यांचे विचार व नायकही तशा पद्धतीचे दाखविले आहेत.

५. रंजनवादी भूमिकेतून काही कादंबऱ्या शृंगारिक वर्णनाकडे वळल्या असून भावना चाळवणारे लेखन म्हणूनही त्यावर टीका झाली.

**संदर्भ**

१. धनवटे, सुमती, वादळज्योत, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, पहिली आवृत्ती, १९५७, प्रस्तावना
२. तत्रैव, पृ. ४९
३. देशमुख, लीला, मी एकटीच जाणार, वर्धा, पहिली आवृत्ती, १९५३, पृ. ७९
४. मांडवकर, डॉ. भाऊ, वैदर्भीय कादंबरी–विश्व, सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. २४

❖❖❖

# सुरेश भट यांची राष्ट्रीय कविता

**प्रा.डॉ.मीनाक्षी दरणे**
श्री. शंकरराव बेझलवार कला वाणिज्य महाविद्यालय अहेरी जि. गडचिरोली

**सारांश**

मराठी कवितांच्या इतिहासात आपल्या उत्कृष्ट गझलनिर्मितीमुळे ज्यांनी इतिहास निर्माण केला असे गझलसम्राट सुरेश भट हे एक श्रेष्ठ प्रतिभावंत कवी सुरेश भटांच्या समर्थ गझलांनी महाराष्ट्रातील रसिकवर्ग प्रभावित झाला. सुरेश भटांच्या भावकवितेत भावनांचे ओथंबलेपण आहे. ते जसे उत्तम गझलकार गीतकार आहेत तितक्याच प्रभाविपणे त्यांनी राष्ट्रीय कविताही लिहिलेल्या आहेत. त्यांची राष्ट्रीय कविता प्रेरणादायी आहे. अन्यायाविरूध्द चाललेल्या जनतेच्या आंदोलनाशी ती एकरूप होते. त्यांची राष्ट्रीय कविता वाचतांना त्यांच्यातला राजकीय कार्यकर्ता झुंजार पत्रकार शब्दाशब्दातून डोकावत राहतो.

**परिचय**

'झंझावात' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात ''मी गझलेच्या प्रेमात पडलो म्हणजे गझलच लिहिणार असे नाही. तर मी माझ्या महाराष्ट्रावर माझ्या मायबोलीवर, मराठीवर, अक्षरश: प्रेम करतो''. त्यामुळेच राष्ट्रीय कविताही त्यांनी प्रभाविपणे लिहिलेली आहे. १९५५ पासून त्यांनी मराठीत गझल लिहायला सुरवात केली. त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९६१ साली 'रूपगंधा' प्रकाशित झाला. त्यानंतर १९६० मध्ये 'रंग माझा वेगळा' आणि १९८३ मध्ये 'एल्गार' त्यानंतर १९९४ मध्ये 'झंझावात' त्यानंतर 'सप्तरंग' असे काव्यसंग्रह प्रकाशित झाले.

**शोध** – कवी सुरेश भटांचे मराठी कविता मराठी भाषा, गझल, यावर नितांत प्रेम आहे. मायबोलीचे सामर्थ्य आम्हाला ठाउक नाही. हे आमचे करंटेपण आहे. मराठी भाषेच्या गोरवार्थ ते म्हणतात.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात, एक जाणतो मराठी
एवढया जगात माय मानतो मराठी

शिरीष पै म्हणतात ''मराठी भाषेच्या नजाकतीचा असा ज्यांना रास्त गर्व आहे त्या सुरेश भरांनी आपल्या मराठी गझलांमध्ये उर्दू गझलांची नजाकत, नखरा, ऐट, मोहकपणा, तेज आणि धार उतरवली नसती तरच नवल. जणु प्रतिज्ञाबध्द होउनच त्यांनी अपार मेहनतीने मराठी गझल यशस्वी करून दाखविली नव्हे मराठी कवितेच्या इतिहासात तिला चिरंतन यश, नांव, आणि स्थान मिळवून दिले''

स्वातंत्रोत्तर काळातील सुरेश भट यांची कविता महाराष्ट्र बदलविण्याची भाषा बोलते.

''उष:काल होता होता काळरात्र झाली'

अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली''

महाराष्ट्रीयांच्या काळजाला हात घालणारा ही कविता 'रंग माझा वेगळा' या काव्यसंग्रहातील आहे. ही कविता 'सिंहासन' या मराठी चित्रपटात गीत म्हणून घेतलेली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रत्येकाच्या आयुष्यात उष:काल यायला पाहिजे होता. पण सर्वत्र अंध:कार झाला. जे स्वप्न पुर्णत्वास गेले नाही. ही कविंची खंत आहे. परंतू कवी रडगाणे न गाता क्रांतीची मशाल पटविल्याशिवाय पर्याय नाही. असे म्हणतो समाजाची मानसिकता संकुचितपणा पाहून कवी व्यथित होतात. काही लोक आशावादी प्रयत्नवादी असतात स्वत:च्या उमेदीवर त्यांच्या विश्वास असतो. पण त्यांनी सुध्दा आपल्या तलवारी म्यान करून ठेवल्या. आपल्या उमेदींना गाडुन टाकले आहे. त्यांच्या शब्दाशब्दातुन राष्ट्रीयत्व पाझरते.

"उभा देश झाला आता
एक बंदीशाला
जिथे देवकीचा पान्हा
दुधाने जळाला"

कसे पुण्य दुदैवी अन,पाप भाग्यषाली देशाची अवस्था तर पार बिघडून गेली. आपला देश जणू बंदीशाळा,देवकीने कृष्णाला दुध पाजले होते.या देशातल्या मातांचा पान्हाच जळाला. सगळी परिस्थिती विपरीत झाली.पुण्य दुदैवी आणि पाप भाग्यशाली ठरले. परिवर्तनाची कास धरायची असल्यास पेटून उठल्याशिवाय पर्याय नाही. देशाला स्वातंत्र मिळवण्यासाठी अनेकांनी बलिदान केले.अशा क्रांतीवीराची चिता अजुन विझली नाही.वध स्तंभावर फाशी गेलेल्या देशभक्तांचे स्मरण अजुनही होत आहे. वधस्तंभ अजुन रक्त मागत आहे.स्वातंत्र्याची मिळून आमच्या पदरात काय पडले.स्वतंत्र्याची आसवेच आम्हाला मिळाली. सुरेश भटांची कविता निराशावादी नसुन देशाच्या विदारक परिस्थितीचे समर्थ चित्रण करणारी आहे.

'गे माय भू' ही'रंग माझा वेगळा' या काव्य संग्रहातील कविता. कवी मातृभूमीबदलची प्रार्थना करतात. शाळांमधुन या कवितेचे वाचन केले जाते. उत्कटता व गेयता या कवितेचे वैशिष्टय आहे.

''गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे आणीन आरतीला हे चंद्र सुर्य तारे'' हे मायभू तुझे माझ्यावर अनंत उपकार आहे तुझे ऋण मी आयुष्यभर विसरणार नाही. हे आई मी तुझे लहानबाळ आहे.माझ्या कवितेतील शब्दांना तू गोडवा येवू दे. सुरेश भटांची ही कविता नितांत सुंदर आहे.

'गीत तुझे' ही त्यांच्या 'रूपगंधा' या काव्यसंग्रहातील कविता कवी या कवितेत महाराष्ट्राची पुजा करतात.मराठी भाषेला कवी आई मानतात.आणि मातृभाषाचे गोडवे गातात. हे आई तुझ्यामुळे माझा माथा उन्नत झाला. माझ्या प्रतिभेचे चंदन झिजवून तुझ्यापायी भावफुलांची उधळण मी करीत आहे. प्रतिभेचे चंदन,आयुष्याचा कापुर अशा संदुर प्रतिमा त्यांनी वापरल्या आहे.

माझ्या आशा माझे जीवन
तुझिया ठायी गेले गुंतुन

वात्सल्याने गेलो न्हाऊन
तुझीया पायी घेऊन लोळन.

आई तुझे सगळीकडे दर्शन घडते कधी तरूपर्णोतुन कधी पहाटेच्या हसऱ्या प्रकाशात, कधी गवताच्या पात्यात तुझा पसारा फार मोठा आहे. नागपूर पासुन मुंबईपर्यंत लोकं तुझी पुण्याई बघत आहे. त्यांच्या कवितांतुन असे राष्ट्रियत्व जाणवते.

'मायबोली' ही कविता अशीच मायमराठीचे कोड कौतुक करते. मराठीचा अभिमान बाळगणे किती सार्थ आहे हे या कवितेवरून कळते

आमुच्या मनामनात दंगते मराठी
आमुच्या रंगारंगात रंगते मराठी

महाराष्ट्राच्या द–याखो–यात मायमराठी हिंडते इथल्या पिकांमधुन डोलते. इथल्या नदयांमधुन वाहते. मात्र ती आपल्याच घरात हाल सोसते. शेवटी मायमराठी मदांध तख्त फोडांयला तयार होते. असा आत्मविश्वास सुरेश भट व्यक्त करतात. शिरीष पै म्हणतात ''संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सुरेशभटांच्या या कवितेने महाराष्ट्रीयांच्या काळजाला हात घतला'' मराठी भाषेचा स्वाभिमान जागृत करणारी ही कविता आहे.

'माझा व–हाड' या कवितेत कवींनी व–हाडची माती तिथली माणस यांचे वर्णन केलेले असून ते लयबध्द आहे. ओवीसारखा तिचा बाज आहे. व–हाडात काळया मातीत पांढर सोनं म्हणजे कापूस पिकते. शेतीची राखणदारी करणारा सोकारी देखील इथे श्रीमंत आहे. इथल्या गायी भरपूर दूध देतात. जणु काही इथे गोकूळ नांदते. इथे गावागावात संत्राच्या बागा आहेत. आकाशात उडणारे राघू जाणा–या येणा–यांना संत्र्याचा आस्वाद घेण्याचे आमंत्रण देतात. स्त्रियांचा साजसृंगार मराठमोळा आहे. व–हाडाकडे महादेवाचा डोंगर आहे. हा भोळा शेतकरी म्हणजे भोळा महादेवच आहे.

'' माझ्या व–हाड देशात रंगे बंगल्याच पान चुना लावते लक्षुमी काथ लावी नारायण'' या कवितेत व–हाडची माती, माणसं, स्त्रिया, निसर्ग यातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. 'भीमवंदना' ही कविता अशीच अजरामर आहे. मोजक्या शब्दात ते या महापुरूषाचे वर्णन करतात. बाबासाहेब हा एक प्रचंड झंझावात आहे. ––''कालचे सारे मुके आज बोलु लागले.''

अन, तुझ्या सत्यासवे, शब्द तोलू लागले'' तुझ्या शब्दांच्या पूर्ततेसाठी आम्ही झटू ही कविता म्हणजे जणू आदरांजलीच आहे. ''नवमहाराष्ट्रगीत' ही कविता म्हणजे महाराष्ट्राच चित्रदर्शन आहे. महाराष्ट्र बदलवून टाकल्याचा ध्यास कवींनी घेतलेली आहे. अतिशय प्रेरणादायी गीत म्हणून उजाड माळरानावर श्रम करून महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेऊ इथे कुणी उपाशी राहणार नाही. भुकेल्यांना भाकर देऊ अनाथांना निवारा देवू. याशब्दामागे कवींची आंतरीक तळमळ आहे. उदयाची पिढी आमच्याकडे अपेक्षेने पहात आहे. कवी आशावादी आहे. उदयाचे यश आपलेच आहे. महाराष्ट्राला सुखी करण्याचे स्वप्न कवी पाहतात. कोयना धरणाचा ते उल्लेख करतात. आज घराघरातला अधार संपला आहे. प्रकाशाचा नवा मार्ग आपणास

कळला आहे. मिळालेले स्वातंत्र्य ठिकविण्यासाठी सतत डोळयात तेल घालून रहावे लागणार आहे याची कवीला जाणीव आहे. सुरेश भटांची ही कविता म्हणजे स्वातत्र्यप्राप्तीनंतर स्वकियांशी केलेला लठा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय भावना जागृत ठेवणारी ही कवता म्हणजे जीवनाच्या अंतरंगाशी त्यातील धूसर स्पंदनाशी एकतान पावते. आपल्याकडे नवप्रवर्तनाचे प्रमुख माध्यम कविताच आहे. आणि सुरेश भटांच्या कवितेतून हे परिवर्तन साध्य होते. सुरेश भटांच्या राष्ट्रीय कविता वाचून आजचा तरूण भरावून जातो. देशाच्या भावी पीढीसाठी हया कविता प्रेरणादायक आहे. मातृभूमीबददलचे प्रेम जे आज नष्ट होत चालले आहे. आपल्या मनात राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करण्याची ताकद सुरेश भटांच्या या राष्ट्रीय कवितेत आहे.

**निष्कर्ष**

- गझलसम्राट सुरेश भट हे प्रतिभावंत कवी आहे.
- त्यांची राष्ट्रीय कविता प्रेरणादायी आहे. ती अन्यायाविरूध्द चाललेल्या जनतेच्या आंदोलनाशी एकरूप होते.
- 'मायबोली' 'उष:काल' होता होता काळरात्र झाली' 'गे माय भू' 'गीत तुझे' 'माझा व—हाड' 'भीमवंदना' 'नवमहाराष्ट्रगीत' या सुरेश भटांच्या अतिशय गाजलेल्या राष्ट्रीय कविता आहेत.
- सुरेश भटांच्या कवितेतून मराठी भाषेच्या सौंदर्याची नजाकत, गोडवा समजून वाचक मराठीच्या प्रेमात पडतो.
- मराठी भाषेचं मराठी मनाचं, मराठी देशाचं, मराठी माणसाचं, गुणगाण ऐकूण मराठी, वाचक प्रभावित होतो. व सुरेश भटांच्या कवितेत रंगून जातो.

**संदर्भ—**

१. 'एल्गार' सुरेश भट तृतियावृत्ती १९९२
२. 'रंगमाझा वेगळा' सुरेश भट पाचवी आवृत्ती १९९२
३. 'झंझावात' सुरेश भट प्रथमावृत्ती १९९४
४. सुरेश भट यांची निवडक कविता' संपादन व प्रस्तावना शिरीष पै पाचवी आवृत्ती २०१०

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with*
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
संशोधन शिल्प

# जाती व्यवस्था आणि समाजसुधारक

**प्रा. संगिता वसंतराव घुईखेडकर,**
गृह अर्थशास्त्र,
मुंगसाजी महाराज महाविद्यालय,
दारव्हा.

भारत या खंडतुल्य देशात हिंदु लोक बहुसंख्येने असल्याने हिंदु धर्मात विविध जातीचा उल्लेख केलेला आहे. ह.भ.प. सातारकर महाराज यांनी जात या शब्दाची व्याखा केलेली आहे ते म्हणतात'' जी मनातुन जात नाही ती जात होय'' परमेश्वराने सर्व सृष्टीची निर्मीती केली. सर्व सजीव प्राणीमात्रांपेक्षा तो श्रेष्ठ आहे. मनुष्य जोपर्यंत प्राणीमात्राला श्रेष्ठ समजत होता तो पर्यंत ठीक होते. पण जेव्हा माणुस दुसऱ्यापेक्षा स्वत:ला श्रेष्ठ समजु लागला, दुसऱ्या माणसाला तुच्छ लेखु लागला तेव्हा अनर्थ ओढावला आणि त्यातुनच सामाजिक विषमतेची विषवल्ली वाढली व आज त्याचा प्रचंड असा विषवृक्ष तयार झालेला आहे.

या जाती व्यवस्थेचा उगम कसा झाला हे पाहायचे असेल तर आपणास खुप मागे जावे लागेल. हिमालयापासुन कन्याकुमारी पर्यंत अस्ताव्यस्त परलेल्या भारतावर सदैव कोणी ना कोणी आक्रमण करीत होते. या आक्रमकांनी हा देश अक्षरश: लुटुन नेला पुर्वी इ.स.पुर्व १५०० वर्षापुर्वी भारतात द्रविड लोकांचे साम्राज्य होते. त्यावेळी आर्यांनी सिंधु नदीच्या खोऱ्यातील द्रविडांवर आक्रमण करुन तो प्रांत काबीज केला व त्यावरुनच आर्याना 'हिंदु' हे नाव पडले अन्य धर्माला जसे संस्थापक आहे तसे हिंदु धर्माला कोणीही संस्थापक नाही.

हळूहळू आर्यांनी उत्तर भारत आपल्या वर्चस्वाखाली आणला. आर्यांचा मुख्य व्यवसाय शेती करणे हा होता आर्यांनी भारतात पाय रोवल्यावर हा देश 'हिंदुस्थान' यानावाने ओळखण्यात येवु लागला याच काळात आर्य लोकांचा वेदावर प्रभाव वाढु लागला वेद हा हिंदुचा मुलाधार आहे. वेद म्हणजे आर्यांच्या पवित्र स्तोत्रांचा संग्रह होय व तीच हिदूंची विचारसरणी होय. आर्यांनी जेव्हा द्रविडांच्यावर आक्रमण करुन त्यांना दक्षिणेकडे रेटले त्याचवेळी खऱ्या अर्थाने जाती व्यवस्थेचा उगम झाला असे म्हणण्यास अतिशोयक्ती ठरणार नाही त्याचवेळी भारतात आर्य आणि आनार्य (द्रविड) अश्या दोन भिन्न संस्कृतीच्या दोन जाती उदयास आल्या. द्रवीड रंगाने काळे,बुटके तर आर्य हे गोरेपान,उंच,धिप्पाड होते. पराभूत द्रविड आर्याचे दास बनले व या दासांनाच लोक शुद्र संबोधू लागले.

इ.स. पुर्व ३०० वर्षापुर्वी हिंदू ऋषी 'मनू' ने 'मनुस्मृतींचे' लीखाण केले त्यात हिंदूचे रितीरीवाज, आचारसंहीता, धार्मिक तसेच सामाजिक कर्तव्याचा उल्लेख आहे व हीच आचारसंहीता पिढयान पिढया चालत आली इतकेच नव्हे तर आजही मनुस्मृतीच्या आधारेच व्रतवैकल्य, उपवास केले जात आहे. जाती व्यवस्थेचा उगम कसा झाला याबददल पुरातन काळापासुन अनेक मतप्रवाह व्यक्त केले जात आहे.

महाभारतात करुक्षेत्रावर अर्जुनास भगवान श्रीकृष्णांनी जी गीता सांगितली त्या भगवतगीतेत जातीव्यवस्थेच्या उगमाबददल एक प्रसंग आहे त्यात भगवान म्हणतात'' माणसाची क्षमता आणि त्याच्या कर्माची फळे या आधारावर मी चार जातीची रचना केली आहे. मी सृष्टीचा निर्माता असुनही कर्माच्या बाबतीत असमर्थ आहे''. जाती व्यवस्थेच्या उगमाबाबत अनेक विचार प्रणाली असल्यातरी 'मनुसमृती' चा जनक मनू हाच जाती व्यवस्थेचा जनक आहे . त्याने चतुवर्णाचा पुरस्कार केला व समाजाने तो स्विकारला. माणसाच्या कामवरुन

ब्राम्हण, क्षत्रीय,वैश्य व शुद्र हे चार वर्ण पाडण्यात आले परंतु त्यामुळेच सामाजिक विषमता निर्माण झाली. मनुच्या मते ब्राम्हण सर्वात श्रेष्ठ आहे.

मनूच्या मते सर्व शक्तीमान ब्रम्हाने ही सृष्टी निर्माण केली आहे. बम्हाच्या मुखातुन ब्राम्हणाचा जन्म झाला.त्याच्या दंडातुन क्षत्रीयांचा , मांडीतुन वैशाचा तर पायातुन शुद्रांचा जन्म झालेला आहे.

ब्रम्हाच्या मुखातुन निघालेल्या ब्राम्हणांवर अध्ययन, अध्यापन,यज्ञ तसेच दुसऱ्यांना मदत इत्यादी विशेष जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या आहेत.

ब्रम्हाच्या दंडातुन जन्मलेल्या क्षत्रियांना शक्तीचे वरदान देण्यात आले धन,संपत्तीचे तसेच जीवीतांचे रक्षण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

ब्रम्हाच्या मांडीतुन जन्मलेल्या वैश्यांवर शेती ,व्यापार करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

ब्रम्हाच्या पायातुन जन्मलेल्या शुद्रांवर वरील तिन्ही उच्च जातीच्या लोकांची सेवा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

वास्तवीक पाहता प्रत्येक व्यक्ती ब्राम्हण,क्षत्रीय,वैश्य व शुद्र असतो. जेव्हा आपण अध्ययन करतो तेव्हा ब्राम्हण असतो,जेव्हा आत्मसंरक्षण करतो तेव्हा क्षत्रीय असतो,जेव्हा किराणामाल आणतो तेव्हा तो स्वस्त वस्तु कोठे मिळेल ते पाहतो. तेव्हा त्याच्यातील वैश्यवृत्ती जागृत होते व जेव्हा स्वत:ची स्वच्छता करतो तेव्हा तो शुद्र असतो असे असतांना एकमेकांना तुच्छ लेखण्याची गरज नाही परंतु मनुने ब्राम्हणांचे वर्चस्व कसे टिकुन राहील याकडे सर्वाधिक लक्ष दिले व त्यातुनच सामाजिक विषमता निर्माण झाली.

जाती व्यवस्थेतुन वैयक्तीक स्वार्थाने जन्म घेतला परिणामी उच्च जातींनी हलक्या जातीचे शोषण करण्यास प्रारंभ केला. 'बळी तो कान पिळी' ही म्हण तेव्हापासुनच प्रचलीत झाली असेल. सर्व हिंदू धर्मशास्त्रांनी जाती व्यवस्थेत मान्यता दिली आहे. सर्व पुराणांनी जाती व्यवस्थेचे अस्तीत्व मानले आहे व सामाजिक व्यवस्थेचा एक भाग म्हणून त्याकडे पाहीले गेले. धर्मशास्त्रांत म्हटले आहे की, माणसाने सत्कर्म केल्यास तो उच्च जातीत जन्म घेईल, वाईट काम केल्यास हलक्या जातीत इतकेच नव्हेतर डुक्कर, गाढव आदी पशुच्या जन्मास येईल.

इमारत बांधतांना विटांचे जेवढे महत्त्व असते तितकेच महत्त्व हिंदू समाज रचनेत जातीला देण्यात आले आहे. असमानतेच्या आधारलेल्या जाती व्यवस्थेचे सामाजिक दुष्परीणाम आपणाला आजही पहावयास मिळतात. अस्पृश्यांना शिवायचे नाही त्यांची वस्ती गावाच्या एका कोपऱ्यात, सार्वजनिक ठिकाणी त्यांना पाणी भरण्यास मनाई, मंदीरात प्रवेश करण्यास मनाई,गावातील देवळात शेळया ,मांजरे,पाली, कुत्री हे मुक्त संचार करतात मात्र अस्पृश्यांना मंदीरात प्रवेश नव्हता. उच्चवर्णीयांना हलक्या जातीच्या लोकांना हीण वागणूक देण्याचे जे पाप पुर्वी केले ते पाप माणुसकीला लांच्छनास्पद असे होते. एखादाच संत एकनाथ चुकलेल्या महाराच्या मुलाला कडेवर घेवून त्यांच्या घरी सोडतो,तहानेने व्याकुळ झालेल्या गाढवास गंगाजल पाजाते,एखादा नामदेव संत भाकरी घेवून पळत जाणाऱ्या कुञ्याच्या मागे तुपाची वाटी घेवून जातो.

यासर्व गोष्टींचा विचार करता असे लक्षात येते की, संतानी सर्वाभुती भगवंत पाहीला. त्यांनी समानतेचे बीज रोवले मात्र त्यांच्या कार्याला मर्यादा पडल्या होत्या. ज्ञानेश्वरांकडे शुध्दीपत्र मागणारा आपला समाज पाहीला म्हणजे जाती व्यवस्थेने समाजाची अधोगती कीती झालेली होती याची कल्पना येवू शकते.

ज्यावेळी जाती व्यवस्था ही समाजाचे एक वैशिष्टय बनते त्योवळी सामाजिक स्वातंत्र्याला मुठमाती देण्यात येवून समाजाचे अनेक जातीत विघटन होते. या जाती व्यवस्थेने आपल्या समाजाला अनेक वृत्तभोगी बनविले. जात निवडण्याची संधी कोणालाच नाही. जो ज्या जातीच्या आई वडीलांच्या पोटी जन्माला घेईल तीच त्या व्यक्तीची जात असते. ब्राम्हण,क्षत्रीय या उच्च जाती सोडल्यास प्रत्येक जातीची स्वत:ची अशी पंचायत असते व त्या पंचायतीस व्यापक अधिकारही होते. जात पंचायतीच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस जातीतुन बहीष्कृत केल्या जात असे.तसेच जाती प्रथेनुसार एका जातीच्या व्यक्तीला दुसऱ्या जातीच्या व्यक्तीशी लग्न करण्यास मनाई असे. तेव्हा सजाती विवाहाचे तत्व इतके प्रभावी होते की, तो जाती व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग बनलेला होत. अश्या प्रकारे जाती व्यवस्थेने जाती संघटीत होत गेल्या त्यामुळे सामाजिक एकरुपता पुर्णपणे नष्ट झाली हे सत्य नाकारता येत नाही.

भारतात ब्रिटीशांची राजवट आल्यावर अनेक व्यापक परिणाम झाले. परिवर्तनाची नवी बीजे रुजली गेली,ब्रिटीश राजवटीने हिदू समाजाच्या जाती व्यवस्थेवर प्रहार करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम ब्रिटीशांनी आर्थिक व राजनैतीक शक्ती विशेषत: उच्च व मध्यम जातीमधील असमानतेवर हल्ला चढविला. त्यांनी आपल्या समाज व्यवस्थेत समान न्याय, समता,शिक्षणाबाबतचे उदार धोरण याबाबतचे नविन विचार सरणी आणण्याचा प्रयत्न केला त्यामुळे न्यायासाठी ब्राम्हणेत्तर वर्गही न्यायालयाचे दरवाजे ठोठावू लागला. अस्पृश्यतेच्या बाबतीत ही समाजात तिरस्काराची भावना समाजात निर्माण होवू लागली. अश्याप्रकारे केवळ आर्थिक नव्हेतर सामाजिक मुल्यांच्या स्वरुपात व समानतेच्या पाश्चिमात्य आर्दशामुळे अनेक जाती संघटीत होवू लागल्या व निपक्ष व्यवस्थेच्या मागणीचा जोर वाढू लागला. अर्थी त्या नविन वातावरणाला उच्चवर्णीयांकडून तीव्र विरोध होवू लागला व त्यातुन आंदोलनाचा जन्म झाला.

स्त्रीयांना शिक्षण , सती प्रथेचे उच्चाटन यासाठी आंदोलने होवू लागली. ब्राम्हण संस्कृतीच्या विरोधात त्यांचे वर्चस्व संपुष्टात आणण्यासाठी आंदोलने होवू लागली. महाराष्ट्रात महात्मा जोतीबा फुले,मद्रासमध्ये इ.व्ही. रामास्वामी नायकर यांनी आंदोलनाची पताका खांदयावर घेतली. समाजातील अस्पृश्यते विरुध्द महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शाहू महाराज इ.थोर सामाजिक क्रांतीकारकांनी चळवळ उभारली. महाडचे चवदार तळे, नाशिकचा काळाराम मंदीर प्रवेश हे आंबेडकर यांच्या अस्पृश्यते विरुध्दच्या आंदोलनातील महत्त्वाचे व ऐतिहासीक टप्पे म्हणावे लागतील.

महात्मा फुले यांनी अस्पृश्याांना स्वत:च्या घरातील पाण्याचा हौद खुला केला. कट्टर सनातनीचे शहर असलेल्या पुण्यासारख्या शहरात त्या काळी अस्पृश्यांना स्वत:च्या घरातील पाणी देणे हे काही सोपे नाही. पण ज्योतीबा फुले यांनी ते धाडस केले. विधवा पुर्नविवाह,स्त्री शिक्षणासाठी त्यांनी जे कार्य केले त्याला इतिहासात तोड नाही. स्वातत्रवीर सावरकर, प्रबोधनकार ठाकरे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे हे समाज सुधारक महाराष्ट्राचे भुषण आहेत या थारे समाज सुधारकांच्या महाराष्ट्रात आपण जन्मलो ही भाग्याची गोष्ट आहे.

महात्मा ज्योतीबा फुले मोठे निर्धाराचे आणि क्रांतीकारक वृत्तीचे गृहस्थ होते. त्यामुळे अनेक संकटांना तोंड देवून प्रतीकुल परिस्थितीत त्यांनी अगदी शेवटपर्यंत जे कार्य केले,त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात त्यांना मानाचे स्थान मिळाले. महात्मा ज्योतीबा फुले म्हणजे एकोणिसाव्या शतकात पेशवाई नष्ट होवून इंग्रजांचे राज्य आल्यावर त्यांनी आपल्या बरोबर आणलेल्या पाश्चात्य मुल्यांचा परीस्पर्श झाल्यामुळे

महाराष्ट्राला लाभलेले एक भव्यदिव्य स्वप्न होय. जोतीरावांच्या समकालीन बहुसंख्य पांढरपेशांनी त्यांचे योगदान जाणले नाही परंतु जसजसा काळ पुढे सरकतो आहे तसतसे जोतीरावांचे महात्म्य उजळुन निघत आहे. शेकडो वर्ष दाबुन, दडपून ठेवलेल्या बहुजन समाजाच्या आक्रोशांचा स्फोट महात्मा फुलेंच्या मुखातुन आक्रमकरित्या झाला. महात्मा ज्योतीबा फुले हे कर्त्या समाजसुधारकांचे मेरुमणी होते. हंटर कमीशन पुढे प्राथमिक शिक्षण सार्वत्रीक व मोफत केले पाहीजे अशी आग्रहाची मागणी करणारे पहीले शिक्षणतज्ञ,राष्ट्र सामर्थ्यवादी व्हायचे असेल तर संपुर्ण समाज समतेच्या मुल्यांवर झाला पहीजे म्हणून आपले संपुर्ण आयुष्य वेचणारे ,शैक्षणिक,व सामाजिक क्षेत्राात मौलीक कार्य केल्याबददल सरकारकडून पुरस्कार प्राप्त करणारे पहीले समाज सुधारक व शिक्षण तज्ञ आणि आयुष्याच्या शेवटी जनतेकडून'महात्मा' ही सार्थवादी पदावी प्राप्त करुन घेणारे पहीले कर्मवीर होय.

**सारांश** –

भारतीय समाज व्यवस्थेने या मातीतील मोठ मोठया शुरवीरांना व समाज सुधारकांना ही सोडले नाही तर सामान्य माणसंची काय अवस्था असेल. शिवाजीराजे,राजर्षी शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर,महात्मा फुले यांच्या सारख्या महान विभुती या जात्यात पिसल्या गेल्या म्हणून त्यांनी यांच्या उध्दाराचे कार्य केले.त्यांच्या अथक प्रयत्नाने व परिश्रमाने अस्पृश्यांची अस्मीता जागी झाली आणि त्यांच्या जीवनात परिवर्तनाची पहाट आली हे निर्विवाद सत्य आहे.

# Relationships in Arundhati Roy's Novel 'The God of small things'

**Prashant S. Jawade**
Indira Mahavidyalaya Kalamb.

## Introduction

The novel 'God of small things' has created a great impression in society. It can be seen on various social grounds. it presents the problem of explanation oppression and down madden and toadied the social problems . it also presented caste dissemination and how the people from lower caste are suffered from the social caste based machinery talking about the relationship presented in the novel that women are not enjoyed the democratic rule. The untouchable protagonist 'Velatha introduced the various social issues which are rendered in society of Kerala. Kerala we always considered as society aware state. It has well known literacy rate and tradition of matrix of politics dominating.

The novel focuses some important issues like love and feelings of love how helps is associated with the some that have childhood experiences etc. The god of small things high lights the positions of women folk in India, It also throws light the struggle of women society, revenge against exploitation, facture. Which they observed from dominated conservative society. In the novel ``The God of small things three generation of women are shown under different shaggily and airline stances. Mammary is from older generation then generation of Ammu and younger generation ''is of Rahel. These three generation women persecuted the states of women in Hinduism. Divorced has no opportunity to live liked normal married /unmarried single women? No respectable eyes in society to see such divorced women.

The first character Mammachi lived under the controllable power of male society she got married in her appropriate age of marriage with seventeen years older to her wanted to regulate every step Mammachi. She was promising women but Mammachi ordered to leave her career and lived at house as ordinary wife cum servant. This example is a domination of male as husband on women. Domestic violences are also occured in marriage life of Mammachi Papachi often use a brass flower case to beat the Mammachi on save things reasons. The Papachi did not respect the Mammachi as a life partner and insulted her whenever he got the opportunity. Mammachi was the other man who represented domination of man and unnecessary power on Mammachi..Actually Mammachi established pickles factory but chichi shown his ownership as original owner and Chacko passively. When Chacko returned home .the divorce was took place between him and Margaret the position of Chacko s not so bad in society and if we compare it with Mammachi it very bad unreported which is already approved by society. The male has no another nothing restrictions and women should follow the social resection after the breakages also. There is no consideration of feeling and minted disturbances needs etc.

The representative of second generation the Ammu, He is an innocent child deprived from facilities which are available for both girl and boys . The parents have more love, care and affective as compare to Ammu s brother.

Her place weds not as well as she was single part of two children. Though she live with her parent, she loves only a choice to live but controlled by men which are existed in the family. When she was engaged with her second husband.

Who is not well wage-earner One day he sold Ammu to his manager. She refused for such relationship and second divorce was tool place and her position automatically become worse in society. According to the society's belief and taboos a good women should live with her has band and accept her husband without conditions. A divorced woman is bad reputed women. Nobody allowed her in auspicious , good works rather she is equal to un-virtuous women.

From the character of Ammu .we observed that there are women live Ammu, who tries to rebel against beliefs, particularly system and values which differentiates the man and women . she did not follow her mother and she cannot accept unethical attitude and her husband and favour divorce then leaving her martial life. Ammu is the example who raises voice again commanded morbid of India.

Rahel Ammu's daughter who was of third generation. Who born and brought up as unwanted child .she did not created place in family and society did not touch the Hindu traditions. She becomes a dare once old man in Ayemenem asked about identity she replied we are divorced she did not worry about the thinking of old man after reply.

Chacko is represented as a male power for exploitation torture etc. he distributed his mother ,wife and sister also. Amans inter religious marriage is bused but Chacko engaged with low caste women is neglected on the base of man needs. On the other hand Ammus physical relationship with the untouchable man Velutha is criticized and labeled as illicit. In this novel it is observed that there are same different rules and prohibition to women as compare to men. After divorce nothing would be changed in chacko life he enjoyed all happiness but his sister Ammu's safeness in the novel.

## Conclusion

Arundhati Roys made a step against the shakers of women from the society. She wanted to create awareness about the rig lies of women. Whether it may be in property also. In the novel the Chacko behaves like a single wonder of Ayemenem house and refused the share of his sister. This display the dissimilar conditions to men and women .through the area of small things .Arundhati Roys wanted to bring very sad pictures of women in male dominated society. The role of women is homemade and mother who forms family. if we hurt the women they we distributed not only the family but also break the important relationship in life. This what happened with Ammu then with her children and they open unfortunate life. Arundhati has depicted lower level of women in social and economical reference. Divorced women her life becomes curse because society changes. Changes it treatment to such divorced women. in this way Roy focused some femininities perspectives' from the God of small things.

## Reference

Prasad amaranth Arundhati Roys
The God of small things ; a critical appraisal. Roys arundhati ; The God of small things New Delhi :Penguin books India, Pvt. Ltd. 2002.

# बालगुन्हेगारी एक सामाजिक समस्या

**प्रा. कु. सरोज यादवराव लखदिवे,**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख,
इंदिरा महाविद्यालय, कळंब.

मुल हे ओल्या मातीचा गोळा असतो. जसे घडविले तसे घडते, असे आधी म्हटले जायचे. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बदलाच्या कौटूंबिक वातावरणामुळे आईवडीलांना मुलांसाठी पुरेसा वेळ नाही. त्यात मुलांचे जग विस्तारले आहे. ट्युशन, शाळा, कॉलेज, विविध क्लासेस निमित्त मुळे जास्तीत जास्त वेळ बाहेर राहतात. बाहेरच्या वातावरणाचा त्याच्यावर जास्त प्रभाव पडतो. उठता बसता संस्कार करणारे आई वडिल त्यांना नको असते. पालक मात्र आपली मुले लहानच आहेत असे समजून चालतात.

पालकांनी दुर्लक्ष केल्यामुळ पालकांशी सतत संघर्ष होत असल्यामुळे, सांपत्तीक स्थिती खराब असल्यामुळे वारंवार अपयश आल्यामुळे अनेक मुलांच्या मनात भावनक संघर्ष निर्माण होतो. आणि मुल गुन्हेगारी प्रवृत्ती कडे वळते.

आजचे गुन्हेगार मुळ हे इतर मुलांपेक्षा मुळातच वेगळे नसते. त्यांच्या इच्छा, आकांक्षा, प्रेरणा इतर मुलांसारख्याच असतात पण काही वैयक्तिक आणि परिस्थितीजन्य अडचणीमुळे त्यांची वर्तणूक बिघडलेली दिसते. ह्या अडचणी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतीक प्रश्नांबाबत निर्माण झालेल्या असतात. हे बिघडलेले मुल मग कायद्याच्या कचाट्यात सापडते. ज्या समाजाच्या रक्षणासाठी कायदे केलेले असतात त्याच समाजाचा मुल एक घटक असते आणि समाजानेच दुर्लक्ष केल्याने ते गुन्हेगार झाले असते.

बहुतेक बालगुन्हेगार मोठेपणी गुन्हेगार होण्याची शक्यता असते. कुटूंबाचे व समाजाचे बालगुन्हेगारीमुळे बरेच नुकसान होते. बालगुन्हेगाराचे पुनर्वसन करण्यात बरीच शक्ती व पैसा खर्च होतो.

व्याख्या :– १) एस. व्ही. राव, '' मानसिक विकृती असलेली व लहानपणापासूनच मानसिक ताण असलेली जी अपसामान्य वर्तन दाखवितात ती म्हणजे बालगुन्हेगारी होय.''

२) भारतीय दंडविधान संविधानामध्ये बालन्याय कायदा (१९८६) '' १६ वर्षाखालील मुलगा व १८ वर्षाखालील मुलगी जेव्हा कायद्याच्या चौकटीत न बसणारे वर्तन करतात तेव्हा ती बालगुन्हेगार ठरतात.''

**बालगुन्हेगारीची कारणे :–**

१) अनुवंशिकता : बालकामध्ये गुन्हा करण्याची प्रवृत्ती हा अनुवंशिक गुणांचा प्रभाव असतो असे लेम्ब्रोसो व त्यांच्या अनुयायाचे मत होते तर लीन या मानसशास्त्रज्ञांच्या मते मुलांमध्ये xy व मुलीमध्ये xx ही रंगसुत्रे असतात तर काही व्यक्तींमध्ये xxy अशी तीन रंगसुत्रे असतात. ज्या व्यक्तीमध्ये y हे रंगसुत्र जादा असते अशी व्यक्ती आक्रमक, बेजबाबदार व बौध्दीक स्तर कमी असलेली असते. ती बालगुन्हेगार बनण्याची शक्यता अधिक असते.

२) **मेंदूविकृती :–** मुलांचे स्वत:च्या वर्तनावर नियंत्रण राहात नाही. अशी मुले अतिसंवेदनशिल, भावनिकदृष्ट्या असंतुलित व आक्रमक असतात. अशा मुलांना थोडे प्रोत्याहन मिळाले तरी ते गुन्हा करण्यास प्रवृत्त होतात.

३) मज्जाविकृत मुले :— मनातील चिंता, तणाव यांना वाटत करून देण्यासाठी अशी मुले गुन्हे करतात परंतु गुन्हा केल्यानंतर त्यांना पश्चाताव होतो.

४) व्यक्तीमत्व घटक :— बालगुन्हेगारी करणाऱ्या मुलांमध्ये व्यक्तीमत्वाचे काही गुण प्रकर्षाने दिसतात. सामान्य मुलांच्या तुलनेत अपराध करणारी मुले भीतीशी अभिसंधित प्रतिक्रिया लवकर शिकु शकत नाही. या व्यतिरिक्त अपराधी मुलांमध्ये ऋणात्मक आत्महत्या हे लक्षण दिसून येते.

५) विकृत कुटूंबे :— ज्या कुटूंबातून मुलांना सामाजिक जबाबदारीची शिकवण दिली जात नाही अशी कुटूंबे बालगुन्हेगारीस जबाबदार असतात. अशा कुटूंबाचे खालील प्रकार आहेत.

अ) भग्न कुटूंबे
ब) अनैतिक कुटूंबे
क) तिरस्कृत कुटूंबे
ड) मातेचे प्रभुत्व असलेली कुटूंबे

६) कुटूंबाची आर्थिक स्थिती :— कनिष्ठ आर्थिक परिस्थिती असलेल्या कुटूंबातून बालगुन्हेगाराचा उदय झाला असे दिसून येते. मुलांच्या सर्व इच्छा आईवडील पूर्ण करू शकत नाही त्यामुळे ते आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी गुन्हे करतात.

७) शहरीकरण व झोपडपट्टी :— औद्योगिक विकासामुळे शहरीकरणात झपाट्याने वाढ होत आहे. पोटभर अन्न मिळविण्यासाठी आईवडील धडपड करीत असतात त्यामुळे त्यांचे मुलांकडे लक्ष राहात नाही. त्यामुळे अशी मुले गुन्हे करतात.

८) समवयस्कांचा प्रभाव :— गुन्हेगार मुले सहसा एकच गुन्हा करत नाही. जास्तीत जास्त मुले ही मित्रांबरोबरच गुन्हे करतात.

९) हिंसा दर्शनाचा प्रभाव :— अनेक चित्रपटातून व दुरदर्शनाच्या कार्यक्रमातून हिंसाचार मोठ्या प्रमाणात दाखविला जातो. याचा परिणाम मुलांच्या बालमनावर होतो.

१०) बालसंगोपन पध्दती :— बालगुन्हेगारी व बालसंगोपन यांचा संबंध अनेक संशोधनातून सिध्द झाला आहे. उदा. बालकात चोरी करणे हे सुरूवातीला समजत नाही त्यामुळे ते वर्गमित्रांच्या पेन, पेन्सील चोरून आणते. अशावेळेस घरातील व्यक्ती ही गोष्ट कशी चुकीची आहे हे जर पटवून दिले तर पुन्हा त्या वस्तू तो आणणार नाही पण त्याला जर त्या वस्तू आणणे म्हणजे चोरी करणे आहे व त्या वस्तू त्याने वापस करून द्यावया असे सांगितले तर तो त्या वस्तू वापस करेल. जर त्याला समजावले नाही तर तो अशा वस्तू आणतच राहील व मग त्याला चोरीची सवय लागेल.

बालगुन्हेगारी नष्ट करण्यासाठी उपाय :— बालगुन्हेगारी नष्ट करण्यासाठी दोन प्रकारचे उपचार केले जातात. एक म्हणजे बालगुन्हेगारांना सुधारण्याच्या प्रयत्न करणे. दुसरा म्हणजे समाजात बालगुन्हेगार तयारच होवू नये म्हणजे प्रतिबंधात्मक उपाय योजने.

सुधारणात्मक उपाय :— बालगुन्हेगारांना सुधारणसाठी शिक्षेऐवजी शिक्षण या मुलभूत दृष्टीकोनावर सर्व उपचार पध्दती आधारलेल्या असतात.

१) बालगुन्हेगारांसाठी स्वतंत्र न्यायालये असतात. मुलांचा गुन्हा कबुल झाल्यानंतर त्याला रिमांड होम, बोर्स्टल शाळा सर्टिफाईड अप्रव्हड स्कुल, प्रोबेशन होस्टेल यासारख्या संस्थामध्ये शालेय शिक्षण, सुतारकाम, विणकाम, चित्रकला, बागकाम अशा प्रकारचे शिक्षण दिले जाते. सरकारी नोकऱ्या उपलब्ध करून दिले जाते. अशा पध्दतीने त्यांचे पुर्नवसन होते.

२) प्रतिबंधात्मक उपाय :– बालगुन्हेगारीला आळा घालण्यासाठी उपचारापेक्षा प्रतिबंधक उपायांनाच अधिक महत्व द्यायला पाहिजे व या उपायांची सुरूवात सुरूवातीच्या काळातच व्हायला पाहीजे. तरच ते परिणामकारक होईल. प्रतिबंधाचे पुढील उपाय सांगता येईल.

१) समुदाय नियोजन :– अपराध वर्तनाला प्रतिबंध करण्यासाठी समुदाय जीवनाचे विशिष्ट पध्दतीने नियोजन करावयास हवे. मुलामुलींसाठी बालपीट संघटना व तरूणांसाठी YMCA किंवा YWCA सारख्या संस्था समाजात निर्माण करावयास पाहीजे. व्यावसायीक, सामाजिक व राजकीय कार्यकर्तेदेखील या दृष्टीने महत्वाचे कार्य करू शकतात. जसे झोपडपट्टीतील लोकांना शिक्षण देणे, त्यांचे राहणीमान सुधारणे, युवकांसाठी कला केंद्र, क्रिडाकेंद्र स्थापन करणे असे केल्यास गुन्हेगारीला आळा बसेल.

संशोधनाचा उद्देश :–

१) मुलांच्या समस्यांचा विचार करणे.

२) अशा अवस्थेमध्ये निर्माण होणाऱ्या मानसिक विकृतिचा त्यांच्या व्यक्तीमत्वावर होणारा परिणाम शोधणे.

३) सामाजिकरणातील पालकांची भूमिका लक्षात घेणे.

४) शारिरीक स्वास्थ, जिव्हाळा, आपुलकी, कौतुक न मिळाल्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्व विकासात काही दोष निर्माण होतो याचा शोध घेणे.

५) संकलित तथ्यांच्या आधारावर मुलांच्या समस्यांच्या निराकरणाच्या दृष्टीने उपाय सुचविणे.

७) आईवडिलांच्या अवास्तव अपेक्षांच्या ओझ्याचा दुष्परिणाम व त्यातून मानसिक विकृती तयार होते याचा शोध घेणे.

गृहितकृत्य :–

१) मुलांच्या अवास्तव समस्यामुळे ते गुन्हेगार बनतात.

२) दारिद्रय व कामाची कमतरता यामुळे बालगुन्हेगार बनतात.

३) आईवडिलांच्या अवास्तव अपेक्षांच्या ओझ्यामुळे त्यांच्यात मानसिक विकृती तयार होते व ते बालगुन्हेगार बनतात.

४) शारिरीक स्वास्थ, जिव्हाळा, आपुलकी कौतुक न मिळाल्यामुळे ते बालगुन्हेगार बनतात.

अध्ययन पध्दती व तथ्य संकलन :–

सदर शोध निबंधासाठी निदानात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला असून वैयक्तीक तथा सामुग्रीच्या आधारे संशोधन करण्यात आले आहे. ग्रंथ, वर्तमान पत्रातील लेख व इतर माहितीच्या आधारे तथ्यांचे संकलन करणत आले असून प्राप्त तथ्यांचे विश्लेषन तंत्राव्दारे वस्तूनिष्ठरित्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यातून समस्या जाणून घेण्याचा व त्यांच मानसिक जडणघडणीला जबाबदार घटकांचा विचार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

निष्कर्ष :–

कौटूंबिक वातावरणाचा, आजुबाजुच्या वातावरणाचा, अपयश मिळाल्यामुळे, वाईट संगतीमुळे, व्यसनाधीनतेमुळे, विवंचनेमुळे, समाजाबद्दल तिव्र राग निर्माण झाल्यामुळे बालगुन्हेगार तयार होत असतात. जी मुले असुरक्षित वातावरणात वाढते त्यांच्यामनात जगाविषयी शत्रुत्वाची भावना निर्माण होत असते. त्यांना जे मिळावे असे वाटते ते मिळविण्यासाठी ते हिंसक मार्गाचा पण अवलंब करतात असे दिसून आले.

संदर्भग्रंथ :–

१) मुले व गुन्हेगारी : अयालवारिस लिला–श्रीविद्या प्रकाशन
२) मानसशास्त्र बी.डी.गरूड, एस.बी.निंबाळकर, एन.आय.ठाकोर, सौ.तनुजा खेर, एस.एन.मोहिते.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with*
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
संशोधन शिल्प

# "कळंब तालुक्यातील कोलाम जमातींचे आर्थिक व सामाजिक संरचनेच भौगोलिक अध्ययन"

**प्रा. एन. व्ही. नरुले**
(भूगोल विभाग प्रमूख)
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि.- यवतमाळ.

**प्रस्तावना :–**

पृथ्वीवरिल नैसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या तसेच संपूर्ण जीवन नैसर्गिक घटकांवर अवलंबून असणाऱ्या लोकांना आदिवासी किंवा आदिम जमातिचे लोक म्हणून संबोधल्या जाते. आद्यपाषाण युगापासून ते धातू युगापर्यंत मानवाचा प्रवास हेच दर्शवितो की, जगाच्या कोणत्या ना कोणत्यातरी भूभागावर मानव आपले वास्तव्य करुन स्थिरावू लागलेले आहे. त्यापैकी काहींनी खेडी पसंत केली तर काहींनी जंगले किंवा लोकवस्ती पासून दुर्गम दूर अशा ठिकाणी वास्तव्य केलेले आहे. अशा लोकांना आदिवासी म्हणून संबोधले जाते. हे लोक आपल्या रूढी, परंपरा, रिती–रिवाज, सण, उत्सव यांना आजही मानतात व साजरे करतात. म्हणूनच हे लोक आपल्या विशिष्ट संस्कृती तसेच पध्दती यांच्यामुळे इतरांपेक्षा वेगळे असतात.

**डी. एन. मुजूमदार** यांच्यामते, '' आदिवासी म्हणजे एकच समूहाचे नाव असणारा एकाच भूप्रदेशावर राहणारा, एकच बोलीभाषा बोलणरा, विवाह, व्यवसाय व अन्य बाबतीत एकाच प्रकारचे नियम पाळणारा असा कुटूंब समुह होय''.

**डब्ल्यू. जे. पेरी.** यांनी आदिवासींची कमीत कमी वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहे. त्यांच्यामते, '' समान बोलीभाषा बोलणारा व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समुदायाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात''.

यवतमाळ जिल्ह्यात १६ तालुके असून २१०८ गावे आहेत. जिल्ह्यात आदिवासी जमातीत कोलाम, पारधान, गोंड, आंध, गवारी, पारधी, लोकांच्या वस्ती आहेत. कळंब तालुका हा यवतमाळ जिल्हयात येतो. कळंब तालुक्यात आदिवासी जमातीत कोलाम जमात सर्वात जास्त आहे.

आदिवासी कोलाम समाज हा इतरांपेक्षा म्हणजेच इतर समाजापेक्षा वेगळा असतो. तो विशिष्ट भूप्रदेश, कमी प्रमाण, एकाच रक्त संबंधावर आधारीत स्वत:ची बोलीभाषा परंतु लिपीचा व त्यांच्या ज्ञानाचा अभाव असलेली वेगळी जिवन पध्दती, साधी अर्थव्यवस्था, समान धर्म, सामाजिक एकजिनसीपणा, रूढी, परंपरा, रितिरिवाज, सर्वत्र समान असेल अशा वैशिष्ट्यांनीच कोलाम समाजाचे वेगळेपण दिसून येते. कोलाम हे आपल्या संस्कृतीचे पालन अत्यंत काटेकोरपणे करीत असतात. त्यांच्या जीवनातील सर्व घटनांची चिकित्सा याच निकषांवर ते करित असात. त्यामुळे जीवनात घडणाऱ्या कोणत्याही घटनेविषयी ते जागृत असतात. त्यांच्या लोकमताचा प्रभाव त्यांच्या जीवनावर पडलेला असतो आणि म्हणूनच त्यांच्या आचरणात भिन्नता आढळत नाही.

**सद्य:स्थिती :–**

मानवाचा विकासक्रम जाणून घेण्यासाठी आदिवासी कोलाम जमातीच्या आर्थिक व सामाजिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. कारण की अलिकडच्या काळात प्रत्येक समाज व सामाजिक घटकात परिवर्तन होत आहे. परंतु या परिवर्तनाची गती व दिशा प्रत्येक समाज व समुहाची वेगवेगळी दिसून येते. तसेच या परिवर्तनाचा परिणाम आदिवासी समाजवर सुध्दा होत आहे. कारण अलिकडे यांचा विकास घडवून आणण्याकरिता वेगळे कार्यक्रम धोरण, योजना राबविण्यात येत आहे त्यामुळे या घटकांचा परिणाम त्यांच्यावर किती झालेला आहे हे अभ्यासणे महत्वाचे आहे. तसे पाहिले तर आदिवासी जमातीचे लोक आपल्या सामाजिक सांस्कृतिक परंपरा विषयी अत्यंत संवेदनशील असतात. त्यामुळे त्यांच्या विकासाकरिता

आखलेल्या योजनांचा लाभ ते किती घेतात व त्यामुळे त्यांच्यात काही परिवर्तन घडून आलेले आहेत काय? हे सुध्दा अलिकडे महत्वाचे आहे.

शासनाने या लोकांचा व त्यांच्या क्षेत्रांचा विकास घडविण्या करिता आणी त्यांना प्रवाहाता आणण्या करिता प्रत्यत्न केलेला आहे. १९७० मध्ये त्यांचा विकास करण्याच्या कल्पनेत त्यांची आर्थिक वृध्दी हाच एक घटक महत्वाचा होता. परंतु १९९० मध्ये संयुक्त राष्ट्र संघविकास कार्यक्रम (United National Development Programme), यांच्या मतानुसार आदिवासी समाजाचा केवळ आर्थिक विकास करणे महत्वाचे नसुन त्यांच्या इतरही जीवनोपयोगी घटकांचा विकास करणे महत्वाचे आहे. त्यांना शिक्षणाच्या संधी, आरोग्य सेवा व संपूर्ण जीवनस्तर उंचावणाऱ्या संधी उपलब्ध करून देणे होय. ही विकास प्रक्रिया मानव केंद्रित असावी त्यामुळे मानवी गुणवत्ता वाढण्यास मदत होईल व विकासाच्या संधिचा आधिकाधिक उपयोग करून घेता घेईल.

**उद्देश** :–

१. कळंब तालुक्यातील एकूण लोकसंख्येत आदिवासी कोलाम लोकसंख्येचे प्रमाण किती आहे हे अभ्यासणे.
२. कोलाम लोकसंख्येच्या अभिक्षेत्रीय वितरणावर भौगोलिक घटकांचा परिणाम कसा व किती झालेला आहे हे अभ्यासणे.
३. कळंब तालुक्यातील कोलाम लोकसंख्या व त्यांच्या वसाहतीचे प्रारूप, त्यांच्या आकृतीबंध तपासणे.
४. कळंब तालुक्यातील कोलाम लोकसंख्येचा आर्थिकस्तर कसा आहे याचा अभ्यास करणे.
५. कोलाम लोकसंख्येचा सामाजिक स्तर व सामाजिक घटकांची उपलब्धता तपासणे.
६. ज्या प्रदेशात हे लोक राहतात तेथील वाहतुकीचे प्रारूप, विविध वाहतुकीचे मार्ग याचा अभ्यास करणे.
७. कोलाम वसाहती व विविध सेवाकेंद्रे याचा सहसंबंध अभ्यासणे.
८. कोलाम लोकांचा लोक सहभागातून कसा विकास करता येईल तसेच त्यांच्यामध्ये असणाऱ्या सुप्त शक्तींचा उपयोग कसा करता येईल यावर विचार करणे.

**माहिती संकलन व अभ्यास पद्धती** :–

कळंब तालुक्यातील आदिवासी कोलाम जमातीचा अभ्यास करण्यासाठी विविध अभ्यासपध्दतींचा उपयोग करण्यात येईल. हे संशोधन कार्य करतांना काही वेगळया दुय्यम आकडेवारीचा उपयोग केला जाईल. परंतु शक्य असेल तेथे प्राथमिक आकडेवारी गोळा केली जाईल. कोलामांचे क्षेत्र त्यांचा आकार, वस्ती त्यांची स्थाननिश्चिती, क्षेत्रफळ, प्रदेशाची उंची प्रत्यक्षात जावून लक्षात घेतली जाईल. कोलामांचे क्षेत्र त्यांचा आकार, वस्ती त्यांची स्थाननिश्चिती, क्षेत्रफळ, प्रदेशाची उंची प्रत्यक्षात जावून लक्षात घेतली जाईल. आकडेवारीचे विश्लेषण करण्याकरिता विविध सांख्यिकिय पध्दतीचा व सुत्राचा वापर करण्यात येईल. या प्रदेशातील शिक्षण सोयी, आरोग्य सुविधा, वाहतुक मार्गाचे जाळे, त्यांचा विकास व लोकसंख्या यांचा परस्पर संबंध अभ्यासन्या करिता गणितीय पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. कोलाम लोकसंख्या यांचा प्रदेश, भौगोलिक घटक यांच्यात असलेला परस्पर संबंध तपासण्याचा प्रयत्न केला जाईल. कोलामांच्या जीवनपध्दती रूढी, परंपरा, चालीरीती यांची प्रत्यक्षपणे माहिती गोळा करण्यात येईल. गोळा केलेल्या माहितीचे विविध सांख्यिकीय पध्दतीद्वारे विश्लेषण करण्यात येईल.

**निष्कर्ष** :–

मानवी जीवनावर पर्यावरणाचा फार मोठा परिणाम होत असतो. नैसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या लोकांना आदिवासी कोलाम असे म्हणतात. यांची संपूर्ण जीवनपध्दती पर्यावरणशी निगडीत आहे. त्यामुळेच कळंब तालूक्यातील आदिवासी कोलाम समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास बाहेरील जगाच्या मानाने कमी झालेला आहे. परंतु विकास कार्यक्रमामुळे त्यांच्या जीवनाचा स्तर कसा वाढवता येईल याचे महत्व त्यांना पटवून दिले तर निश्चितच त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

संदर्भ :–


| | | |
|---|---|---|
| Krober A. L. (1948) | - | Anthropology. |
| Government of India | - | Census of India 2001. |
| Chauhan B. R. (19891) | | "India socio –Economic Profiles". |
| Encyclopedia of Social | - | Planning Commission. |
| Working is India (1968) | - | govt. of India- |
| Basu S. K. (1983) | - | Trible Health of India (Edited) ManaK Publisher's New Delhi. |
| नायडू वि. आर. १९७६ | . | भारत की आदिवासी, राधा पल्बिकेशन, अन्सारी रोड दरीयागंज नई दिल्ली. |
| डॉ. विजय कुमार तिवारी १९९८ | | भारत की जनजातीया हिमालय पब्लिकेशन मुंबई. |
| डॉ. गोविंद गारे | . | महाराष्टतील जमात कान्टीनेंटल प्रकाशन पुणे. |
| गुरूनाथ नागगोंडे | . | भारतीय आदिवासी कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे. |

# Silicon as a Basic Building Block of Life: Another Competitor to Carbon

**K.R. Nemade**

Department of Physics, Indira College, Kalamb 445401, India.

**Abstract**

All prosperous life on the earth is developed on the basis of carbon that is carbon atom is fundamental constituent of many life cycles on the earth. In the search of extraterrestrial life, scientists proposed life based on the element silicon. This research article is an attempt to check the possibility of silicon based life. In this article, main requirements of life are also discussed in the context of silicon chemistry. In order to go for another alternative to carbon that is silicon, we discussed chemical foundation based on the silicon. In the present short communication, we discussed the chemistry of silicon element to analyze the possibility of life.

**Keywords:** Silicon, carbon, extraterrestrial life

## 1. Introduction

### 1.1 History of silicon based life

Carbon is a basic building block element of all known species on earth. In the search of extra terrestrial life there is one element which has chemical strength as that of carbon nearly in same manner and it can form the life at different atmospheric condition that is Silicon. The chemistry of life is very well known to carbon but there is silicon which knows the basic requirement for life. But we would need to choose the competitor of carbon very carefully because the life prosperous from carbon is developed extremely and its good example is today's human being. We find carbon in every things from cell to DNA, German Astrophysicist Julius Scheiner gives theory for same topic and he was studied the suitability of silicon as life creating element [1]. Further, British Chemist Jemes Emerson Reynolds in 1893 (1), Pointed out that the heat stability of silicon compounds may support for life to exist at high temperature [2]. JBS Haldane suggested that life may be obtained at deep of the planet based on partial molten silicates, oxidation of iron perhaps providing it energy [3]. There is enough silicon in the universe for silicon based life to be a real possibility of life. Silicon is 0.003% of the atoms in the universe. Carbon is 0.05% of the atoms in the universe. We can measure this by looking spectrograph of light. Silicon, like carbon, is form by every star in his last phase of life. All element before iron is always created. In general, the rule is the more stars there have been in a part of space, the more silicon atom are present [4].

### 1.2 Requirements of life

Requirements of life in term of chemistry are very complex. It require most versatile element. It can form ring with itself and form long chain. This feature mainly required for the formation of complex organs like brain, heart. Basically life as we know is based on element Carbon, Hydrogen, Oxygen, Phosphorus, Sulpher, and Nitrogen. Other element also presents in body but they are not important. Another feature required for development of life is that its basic building block element must undergo double, triple bonding and handedness.

**2. Carbon versus Silicon**

**2.1 Chemistry of IV$^{th}$ A group element**

All elements whose valence shell containing four electrons are kept in the IVth A group and called them as a P block elements. Because of same number of electron in valence shell, there are similarities in their physical and chemical properties. All the elements from this group can form long chain or polymer. Carbon can make four bonds with various elements till the present date one million of carbon compound known to us. There is one more element which is belongs to IV-A group which can form long chain or polymer which is also suitable for evolution of life and that element is silicon.

**2.2 Long chains**

Carbon is a most versatile element because it possesses special ability of forming long chains through a single bond where as one of the serious problems regarding with silicon based life is that silicon can't form chains like carbon. Its chains are very unstable [5].

**2.3 Double and triple bonds**

Another important feature of carbon atom is that it can form double and triple bond easily. Some time complex shape is needed for molecule to function well, like in enzymes. These complex structures look like polymers. In the same fashion, silicon can form double and triple bond but with small polymers.

**2.4 Handedness**

Carbon can easily form four bonds hence it have a property of handedness. Handedness is very important for various enzymes' functions. Silicon has four valence electrons hence it also allow handedness.

**2.5 Combination with other elements**

Carbon has the ability to bond with other atoms especially with Hydrogen, Oxygen, Phosphorus, Sulpher, and Nitrogen which are very important elements for life. Carbon possesses this ability because of its high electronegativity and small bond length of $77\times10^{-12}$ m. Silicon does not have

an electronegativity even near carbon .The electronegativity of the silicon is around the mean of all elements. Bond length of silicon is much higher and its value is $224\times10^{-12}$ m. Because large size of silicon atom it not easily form π-bond which are needed for stable ring [5].

**3. Problems with Silicon based life**

**3.1 Energy storage**

In carbon based life organisms are able to store energy which is getting from metabolic path way for longer time because carbon can form carbohydrate. The release of energy is controlled by enzymes. But in case of silicon such energy storage molecule may be formed.

**3.2 Genetic information**

Genetic information is one common thing to all known life. It is essential for every life cycle. The backbone of DNA and RNA is carbon atom. The nucleotides are formed with carbon and nitrogen. But as mentioned in above section silicon has a very poor affinity with Hydrogen, Oxygen, Phosphorus, Sulpher, and Nitrogen.

**3.3 Silicon dioxide is solid**

Silicon spontaneously attracted to oxygen and therefore combines rapidly with oxygen even at lower temperature forming $SiO_2$. We have plenty of evidence to formation of $SiO_2$ on our planet. The most common form of $SiO_2$ is Quartz. Here on the earth $CO_2$ is gaseous at most temperature, is very soluble in water and broken down into its constituent, while $SiO_2$ does not exist as a gas except at extremely at high temperature well over 2000 °C. $SiO_2$ is completely insoluble in everything. It is difficult break into its constituent atoms. Finally, $SiO_2$ is inert molecule and it is useless for life at lower temperature. Because of its solid state, breathing becomes real problem.

**4. Best environment for silicon based life**

Obviously, life cannot form in every random place. It required some friendly condition to stay an alive after it has been formed. Similarly for silicon based life required some essential conditions. Silicon based life is made to be stable and for fast chemical reaction we discussed about temperature. Without fast reaction the life can not react with environment. At too high temperature bonds get broken very easily. Therefore silicon based life required the limit of temperature in the range of 50 K-1000 K. After temperature liquid medium molecule must be polar, because life required all kinds of ions to be dissolved in our medium. Otherwise life cannot get metals from chemical reactions. Liquid medium must be ampholytic and not too reactive [4].

**5. Conclusion**

In our universe plenty of planets available as discussed above which can provides suitable condition for silicon oriented life. Hence after carbon, silicon is another element which can create life not totally similar to carbon but distinct in many manners. Therefore silicon as a life creating element is not abstract idea .It is relative to condition on planets.

**Acknowledgement**

We are expressing our deep appreciations to Head of Physics Department, Sant Gadage Baba Amravati University, Amravati for providing us the necessary facilities for this work.

**References**

[1] Seth shostak, "The Bricks of life: Exploring the idea of Alien chemistry", (2004)

[2] Reynolds J.E., Nature, (1893)

[3] David Darling, "The Encyclopedia of Astrobiology, Astronomy and space flight: Silicon based life",(2000)

[4] Amantine, Alnilam omega, Blackjackal, Embryonicessence, "Is silicon based life similar to terrestrial life possible?" ATS project (2004)

[5] Nicholas Linn, "Can Silicon based life exist?" (2001)

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with*
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
संशोधन शिल्प

# विदर्भातील कृषी उत्पादनाचे अर्थशास्त्र व विपणन

**प्रा. माधुरी पं. राखुंडे**
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख (वाणिज्यशाखा)
इंदिरा महाविद्यालय कळंब, जि. यवतमाळ.

**प्रस्तावना–**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून जगभरात ओळखला जातो. याचे कारण म्हणजे येथील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ७० टक्के लोकसंख्या आजही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नातही शेतीचा क्षेत्राचा वाटा बऱ्यापैकी आहे. आजही भारतातील अनेक राज्यांमध्ये शेती व्यवसाय हा मुख्य व्यवसाय असल्याने भारतातील शेती हा आर्थिक विकासाचा कणा आहे. असे म्हटले जाते. भारताची अर्थव्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे हे देशाचे प्रथम कर्तव्य मानले जाते. आज उद्योग क्षेत्राची कितीही भरभराट होत असली तरी भारतात मुख्य समजल्या जाणाऱ्या शेती व्यवसायाच्या विकासासाशिवाय उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासाला अर्थ प्राप्त होत नाही. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे मते ''कृषी संस्कृती हीच खरी संस्कृतीची जननी आहे. तिचा विकास करणे जरूरीचे आहे. कृषी हा मानवी जीवनाच्या विकासाचा आद्य उद्योग आहे. कृषी शिवाय मानवी जीवनाचा सिध्दांत निरर्थक आहे. म्हणून शासनाने शेती विकासाकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे.'' डॉ. भाऊसाहेबांच्या मतानुसार शेती व्यवसायाकडे लक्ष दिल्या गेले तर देशाच्या विकासाला गती मिळाल्याशिवाय राहणार नाही.

**विदर्भाचा कृषी विकास –**

विदर्भाची जमीन ही सुपीक आहे. एक–एक जिल्हा भौगोलिक आणि नैसर्गिक दृष्टया संपन्न आहे त्यातही विदर्भ हा पांढऱ्या सोनाचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. कारण येथे कापसाचे उत्पादन भरपूर होते. त्याच बरोबर धान, भुईमुग, डाळी, फळे, भाजीपाला आणि वनसंपत्तीवर प्रक्रिया उद्योगास भरपूर वाव आहे. विदर्भ हा पांढऱ्या सोन्याचा प्रदेश म्हणून प्रसिध्द असला तरी सध्या हे पांढरे सोने पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या नशिबी आत्महत्या करण्याची पाळी आली आहे. जमिनीची नापिकी व त्यामुळे निर्माण होणारा कर्जबाजारीपणा यामुळे आत्महत्या घडत आहे. या पार्श्वभूमीवर कापसाच्या शेती मागील अर्थकारण समजून घेणे आवश्यक आहे. साधारणपणे ४०–५० वर्षापूर्वी शेतकऱ्यांच्या गरजा मर्यादित होत्या. परंतू शहरीकरणाच्या अनुकरणामुळे त्यानंतरच्या पिढी मधील गरजा वाढल्या आहेत. त्यामुळे बरेच शेतकरी अल्पभूधारक झालेले आहेत. परिणामत: शेतीतून मिळणारे उत्पन्न त्यांना पूरेसे होत नाहीत.

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती शेतीतून मिळणाऱ्या शेतमालाच्या उत्पादनाच्या परिमाणाबरोबर शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या शेत मालाच्या बाजारपेठेत किती किंमत मिळते यावर अवलंबून असते. शेतमालाला योग्य किंमत मिळत नसेल तर शेतमालाचे उत्पादन वाढून सुध्दा शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे शक्य नाही. म्हणून शेतमालाच्या उत्पादन वाढीबरोबरच त्याच्या विक्रीची प्रभावी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

रॉयल कमीशनच्या मते,'' शेतकऱ्याची समृध्दी व शेतीसुधारणा विषयक धोरणाचे यश हे शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेच्या सोयी किती प्रमाणात उपलब्ध असतात यावर अवलंबून असते'.

योजना आयोगाच्या मते,'' शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या शेतमालाला बाजारपेठेत मिळणाऱ्या किंमतीचा प्रभाव कृषी उत्पादनावर व शेतकऱ्याच्या आर्थिक कल्याणावर होतो.यावरून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी एका सुयोग्य व आदर्श विपणन पध्दतीची आवश्यकता आहे''.

**''शेतमालाचे विपणन म्हणजे शेतकऱ्याने उत्पादित केलेला शेतमाल प्रत्यक्षपणे ग्राहकाच्या हाती पडे पर्यत कराव्या लागणाऱ्या विविध प्रक्रियांचा समावेश होतो.''** म्हणजे शेतकऱ्याने उत्पादित केलेला शेतमाल शेतकऱ्यांच्या घरी येत पर्यत आणि तो माल प्रत्यक्षात ग्राहकांच्या हातात पडे पर्यत ज्या विविध क्रिया कराव्या लागतात त्या ढोबळ मानाने पुढील प्रमाणे –

१. शेतमाल एकत्रीत करणे.

२. शेतमालाचे बाजारपेठेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रभावी वाहतूक व्यवस्था करणे.
३. शेतमालाचे गुणानुसार वर्गीकरण करणे व त्याला योग्य स्वरूप प्रदान करणे. श
४. शेतमालाची विक्री करणे व किंमत प्रदान करणे.
५. शेतमालाची साठवणूक करणे व गोदामातील शेतमालाचा विमा काढणे.

वरील सर्व क्रिया व्यवस्थितपणे कार्यान्वीत झाल्यावरच शेतमालाची विक्रय व्यवस्था सर्वोत्तम असू शकते.

**विदर्भातील शेतमालाची विपणन पध्दती–**

महाराष्ट्रातील एकूण कापूस लागवडी खालील ३० लाख हेक्टर जमीनीपैकी विदर्भामध्ये १७ लाख हेक्टर जमीनीवर कापूस लागवड केली जाते. म्हणजे महाराष्ट्रातील क्षेत्राच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ विदर्भात असून त्यापैकी २७ टक्के क्षेत्र एकटया यवतमाळ जिल्हयात आहे. त्यानंतर अमरावती, अकोला, चंद्रपूर, वर्धा यांचा क्रमांक लागतो. यावरून असे निदर्शनास येते की विदर्भामध्ये सर्वात जास्त कापूस लागवड होत असून कापसाचे पिक मोठया प्रमाणावर घेतले जाते. आणि म्हणूनच विदर्भ पांढऱ्या सोन्याचा देश म्हणून ओळखला जातो. या पिकासोबतच भात, ज्वारी, सोयाबिन, तूर, मूग, ही पीके घेतली जातात. याशिवाय नागपूर संत्रासाठी प्रसिध्द आहे.

विदर्भातील कृषी मालाच्या विपणनाची समस्या अत्यंत गंभीर आहे. शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या धान्यापैकी ६० टक्के विक्री ही गावांतच केली जाते. खाजगी सावकाराच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी पूर्वीच ठरलेल्या दराप्रमाणे व्याजाची रक्कम मिळवून सावकारांना माल विकून कर्जाची परतफेड केली जाते. तसेच दलालांना सुध्दा कमी दराने माल विकला जातो.

**कापसाचे अर्थकारण –**

कापूस पीक हे हंगामी स्वरूपाचे आहे. शेतकऱ्याला आपला कापूस त्याच हंगामामध्ये विकल्याशिवाय पर्याय नसतो कारण शेतकऱ्याची आर्थिक स्थिती फार बिकट आहे. परिणामी बाजारामध्ये एकाच वेळी मोठया प्रमाणात माल विक्रीस येतो. अर्थशास्त्रीय नियमाप्रमाणे वस्तूची किंमत ही मागणी पुरवठयावर अवलंबून असते. याठिकाणी पुरवठा करणारे जास्त. व पर्यायाने वस्तूंचा पुरवठा जास्त, मागणी करणारे कमी. परीणाम शेतकऱ्यांच्या मालाला मागणी कमी. परिणामत: किंमत कमी, अशी अवस्था सर्वत्र दिसून येते. वास्तविक पाहता हे हंगामी पीक असल्याने ही परिस्थिती दरवर्षी उद्भवणार व शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित मालाची किंमत कमी मिळणार हा नियम या ठिकाणी फसवा आहे कारण पुरवठा हा शेतकऱ्याद्वारे नियंत्रित असू शकणार नाही. व्यापारी एकाधिकारी असल्याने मागणी नियंत्रित राहील परिणामत: किंमत कमी राहील. थोडक्यात शेतमालाची किंमत ही व्यापाराद्वारे निश्चित केली जाते.

यावर उपाय म्हणून केंद्र सरकार शेती उत्पादनाचे भाव ठरविते. केंद्र सरकार कृषी मुल्य आयोग ही जबाबदारी सांभाळते.

**कृषी विपणनाचे दोष व उपाय –**

उत्पादन झाल्यानंतर उत्पादकापासून अंतिम उपभोक्त्यापर्यंत वस्तू पोहचविण्याच्या सर्व क्रियांचा समावेश विपणनात होतो. त्या खालीलप्रमाणे.

१. उत्पादित मालाचे एकत्रिकरण करणे.
२. मालाचे गुणानुसार वर्गिकरण करणे.
३. वस्तुला योग्य स्वरूप देणे.
४. वाहतुकीची व्यवस्था करणे.
५. विक्रि होईपर्यंत मालाची साठवणूक करणे.
६. मालाची विक्री करणे.
७. विक्रेत्याला मालाची किंमत देणे.
८. मालाची विक्री होईपर्यंत जोखीम स्विकारणे इ. क्रियांचा समावेश विपणनात होतो.

**कृषी विपणनातील दोष –**

**१. असंघटीत शेतकरी –**

भारतीय शेतकरी निरक्षर, निर्धन, साधनहीन, असल्यामुळे शेतकरी संघटीत नाही. परिणामत: शेतकऱ्याची सौदाशक्ती कमी आहे. त्यामुळे ते बाजारातील मध्यस्थ, दलाल, व्यापारी व संघटीत लोकांशी स्पर्धा करू शकत नाही. परिणामत: शेतकऱ्याला तोटा सहन करावा लागतो.

**२. संग्रहणाना अभाव–**

भारतीय शेतऱ्याला सर्वात जास्त प्रमाणात कोणत्या संकटाला तोंड दयावे लागत असेल तर ते म्हणजे साठवणूकीची व्यवस्था होय. शेतमालाचे उत्पादन आणि विक्रि यातील काळात शेतमाल गोदामात साठवूण ठेवावा लागतो. गोदामाची योग्य व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्याला आपला कृषी माल कमी किंमतीला विकावा लागतो.

**३. वाहतुकीची अडचण–**

शेतातून बाजारात कृषी माल आणण्यासाठी वाहतूकीची योग्य सोय असणे आवश्यक असते. परंतू वाहतूकीची सोयींच्या अभावामुळे उत्पादित माल स्थानिक बाजारातच कमी किंमतीला विकावा लागतो.

**४. विपणनातील बेकायदेशीर व्यवहार–**

भारतीय बाजारपेठेत शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात शोषण होत असते. यामध्ये खोटी वजने मापे, दलाल व व्यापारी यांच्यात वाटाघाटी, अधिक दलाली, जास्त प्रमाणात नमुना वस्तू काढणे इ. बेकायदेशीर व्यवहारामुळे शेतकऱ्यांचे फार नुकसान होत असते.

याशिवाय ग्रामीण भागात विक्री करणे, मालाचा दर्जा कमी दाखविणे, बाजारपेठेविषयी अज्ञान, योग्य यंत्रनेचा अभाव, प्रबंधनाचा अभाव, विपणन सूचना प्रसारणाचा अभाव इ. अनेक दोष विपणामध्ये दिसून येतात.

**उपाययोजना –**

वरील सर्व दोषांचे निराकरण करण्यासाठी खालील उपाय योजता येतील.

१. मालाची विक्री नियंत्रित बाजारपेठेत होण्यासाठी प्रयत्न करणे व त्यासाठी नियंत्रित बाजारपेठा निर्माण करणे.
२. मालाची श्रेणी ठरविणे व प्रत नियंत्रीत करणे.
३. प्रमाणीत वजने व मापे यांचा योग्य वापर करणे.
४. माल साठवून ठेवण्यासाठी गोदामाची भांडारगृहाची व्यवस्था करणे. शितगृहे निर्माण करणे.
५. बाजाराच्या स्थितीची वेळोवेळी माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे.
६. वाहतूकीची व्यवस्था मोठया प्रमाणात करून देणे.
७. बाजारपेठेची तपासणी करून त्यात वेळोवेळी संशोधन करणे व त्याच सोबत प्रशिक्षण देणे इ. उपाय योजना करावी लागेल.

# Dye Synthesis from Endophytic Fungi Isolated from *Butea monosperma*

**K. P. Suradkar[*1] and D.V. Hande[2]**

[1]Dept. of Botany, Indira Mahavidyalay Kalamb, Dist Yavatmal.

[2]Dept. of Botany, Shri Shivaji Science College Amravati.

[*]Corresponding author: kishorsu5@gmail.com

## Abstract :

In the present study endophytic fungus *Alternaria alternata* was isolated from *Butea monosperma* for dye production. Colour pigments were extracted from isolated endophytic fungus to coloured the textile. Isolated fungal strain revealed high ability to produce dye. Fungal extract was tested on cotton and silk fabrics and exhibited great dyeing property. Investigated fungal extract was subjected to further analysis for quantitative and qualitative determination of dye components.

**Key words:** ***Dye synthesis, Alternaria alternata***

## Introduction :

A dye is a coloured substance that has an affinity to the substrate to which it is being applied. There rae two types of dyes synthethic dyes and natural dyes. Most of the natural dyes are isolated from plant sources (roots, bark, leaves, and stem), also from animals as well as microbes like bacteria and fungi (Chiba *et al* 2006 and Nagia and El-Mohamedy 2007). Natural dyes are not as much of health hazardous, non-polluting and non-toxic (Sivakumar *et al* 2009). Furthermore antimicrobial and antioxidant properties of natural dyes further adds to their optimistic effects. The most important idea of extraction of dyes from natural sources is to avoid the environmental pollution and also to avoid toxic and allergic reactions of synthetic dyes.

Microorganism can produce pigments like anthraquinones, carotenoids, flavonoids, quinines and rubramines in large mount. Fungi are interesting source of pigments which can (Gill and Steglich, 1987, Raisanen, 2001) synthesis several colour coumpounds which have been identified as secondary metabolites. In recent times, there is increasing interest in natural dyes synthesis all through the world as synthetic dyes are being banned by the western countries due to their toxicity (Singh, 2000).

The aim of the present study is to isolate the most potent endophytic fungus from *Butea monosperma* which is well known for colour production and screening of fungus to produce dye components.

## Materials and Methods:

### Isolation and Identification of Fungi

Endophytic fungus was isolated from the *Butea monosperma* by surface sterilization method described by (Suryanarayanan and Vijaykrishna 2011). Isolated fungus was identified on the basis of macroscopic and microscopic characteristics.

### Extraction of Pigments

Conical flasks were taken and 200 mL of distilled water was added along with 4.8 gm of PDB (Potato Dextrose Agar), a pinch of copper sulphate was added to increase the pigmentation and autoclaved. Fungul culture was inoculated in these flask with the help of a sterile cork borer. Flasks were incubated at 28$^{o}$ C on shaker for 3-4 weeks for pigment production.

**Screening of Dye**

Fungal culture broths showing colour was filtered out after 3 weeks of incubation period using Whatmann filter paper no 4. The coloured filtrate was used to dye different textile samples.

**Mordanting**

A set of cotton and silk clothes measuring 3cm x 3cm were taken. 1-3% of ferrous sulphate and potassium dichromate were used as mordants. The clothes were washed with warm water before mordanting. The clothes were treated with mordants at 60$^{o}$ C for 30 minutes with MLR 1:20 and the temperature was maintained with the help of a thermometer. They were cooled with water overnight after the treatment and used for dyeing.

## Results and Discussions:

**Isolation of Fungi**

Endophytic fungus alternaria alternate was isolated from Butea monosperma using Potato Dextrose Agar (PDA) medium. Lactophenol cotton blue staining technique was used to observed the microscopic features. Morphological identification was confirmed by observing these characteristics.

**Extraction of Pigment**

Isolated fungus was inoculated in Potato Dextrose broth (PDB) for 2-3 week for the production of pigments. After 2-3 week broth culture was filtered with Whatmann filter paper to extract the fungal pigments. The filtered extract was used for dyeing the fabric.

**Dyeing of the Fabric**

Two sets of clothes was used for dyeing with the fungal extract as mordanted and unmordanted state. Filtrate extract was use for dyeing the cotton and silk fabrics. Fabric samples were mordanted with potassium dichromate and ferrous sulphate. Mordanted and unmordanted weighing 1gm from each fabric sample. These samples were dyed in 50 ml of colour filtrate using MLR is 1:50 for 45 minutes at 70-80$^{o}$ C temperature. After dyeing the fabrics they were washed by boiling for 5 minute followed by rinsing in cold water. During dyeing the fabrics brown to yellowish colour was obtained.

Variations in colouration was observed in different mordant as well as in among different fabrics. Cotton showed highest affinity to tested extract than the silk fabrics (Table 1 and 2). Cotton takes brownish shade whereas silk revealed yellowish shade after dyeing treatment.

**Table 1. Colour produced by *Alternaria alternata* on Cotton in different mordant.**

| Mordant | Colour obtained |
|---|---|
| Potassium dichromate | |
| Ferrous sulphate | |

| | |
|---|---|
| Potassium dichromate + Ferrous sulphate | |
| Unmordant | |

**Table 2. Colour produced by *Alternaria alternata* on Silk in different mordant.**

| Mordant | Colour obtained |
|---|---|
| Potassium dichromate | |
| Ferrous sulphate |   |
| Potassium dichromate + Ferrous sulphate | |
| Unmordant |   |

## Conclusions:

Isolated endophytic fungus *Alternaria alternata* produce pigments that can be used to dye fabrics. To get the highest pigments production from isolated fungus culture condition can be optimised. In present study concluded that isolated fungus can be a potential source of natural dyes. Quantitative and qualitative determination of dye components is under study.

## References:

Chiba, S., Tsuyoshi, N., Fudou, R., Ojika, M., Murakami, Y., Ogoma, Y., Oguchi, M. And Yamanaka S. (2006) Magenta pigment produced by fungus. *J Gen Appl Microbiol.* 52(4):201-7.

Gill, M. and Steglich, W. (1987) Pigments of fungi (macromycetes). Progress in the chemistry of organic natural products. Volume (51):1-317.

Nagia, F. A. and El-Mohamedy, R. S. R. (2007) Dyeing of wool with natural anthraquinone dyes from *Fusarium oxysporum*. *Dyes and Pigments* (75): 550-555.

Raisanen, R. (2001) Emodin and dermocybin natural anthraquinones as high temperature disperse dyes for polyester and polyamide. *Textile ResearchJournal* (71): 922-927.

Singh, O. P. (2000) Natural dyes. The pros and cons. *The Indian Textile Journal*. 42-50.

Sivakumar, V., Lakshmi, A. J., Vijayeeswaree, J., & Swaminathan, G. (2009) Ultrasound assisted enhancement in natural dye extraction from beetroot for industrial applications and natural dyeing of leather. *Ultrasonics Sonochemistry* (16):782–789.

Suryanarayanan T.S. and Vijaykrishna D. (2011) Fungal endophytes of derail roots of *ficus benghalensis*. Fungal Diversity (8):155-161.

# केळकर समितीचा अहवाल :- समतोल प्रादेशिक विकासाची व्युहरचना

*प्रा. अजय वि. तगलपल्लेवार*
*इंदिरा महाविद्यालय, कळंब*
*जि. यवतमाळ*

## प्रस्तावना

देशातील नागरीकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली म्हणजे संपुर्ण देशाचा आर्थिक विकास झाला असे सामान्यत: अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून सांगता येते. परंतु देशातील सर्व राज्यांचा समतोल आर्थिक विकास झाला असे म्हणता येत नाही. कारण देशातील काही राज्ये आर्थिक विकासाच्या बाबतीत पुढे तर काही राज्ये आर्थिक विकासाच्या बाबतीत मागे असलेली दिसून येते. म्हणुन देशातील सर्व राज्याचा व राज्यातील सर्व विभागाचा विकास झाला तर देशाचा समतोल आर्थिक विकास झाला असे म्हणता येते.

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, भारताच्या सरासरी आर्थिक वृध्दीदरापेक्षा महाराष्ट्राचा आर्थिक वृध्दीदर व दरडोई उत्पन्न जास्त असले तरी महाराष्ट्रात प्रादेशिक विषमता मोठया प्रमाणात आहे. प्रशासनाच्या सोईसाठी महाराष्ट्राचे सहा विभाग पाडण्यात आलेले आहेत. त्यामध्ये मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ यांचा समावेश होतो. यापैकी मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, कोकणातील ठाणे, रायगड, उत्तर महाराष्ट्रातील नाशिक या भागाचा आर्थिक विकास झाला. पण मराठवाडा आणि विदर्भ आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. म्हणजेच महाराष्ट्रात समतोल प्रादेशिक विकास झाला नाही.

याचे महत्वाचे कारण **"राज्यातील सर्वच विभागामध्ये आवश्यक वृध्दीदर साधण्यासाठी आवश्यक क्षमता समान नसल्याने प्रादेशिक असमानतेचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे"** त्यामुळेच संपूर्ण देशामध्ये वेगळया राज्याची मागणी विविध संघटना, राजकीय नेते व त्याभागातील जनता करीत आहे. काही राज्यांचे विभाजन होवुन नवी राज्ये अस्तित्वात आल्याने महाराष्ट्रातही वेगळया विदर्भाच्या मागणीचा जोर वाढला आहे. महाराष्ट्रात असलेला प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी, त्या भागातील समस्यांचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने मा.राज्यपालांच्या निर्देशांना अनुसरून दिनांक ३१ मे २०११ रोजी श्री विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. आणि समितीने आपला अहवाल ऑक्टोंबर २०१३ मध्ये महाराष्ट्र शासनाला सादर केला. या अहवालातील काही महत्वाच्या बाबींवर प्रकाश टाकला आहे.

## समितीची कार्यकक्षा :-

महाराष्ट्रातील समतोल प्रादेशिक विकासाच्या समस्यांचा अभ्यास करुन समस्या निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ मे २०११ रोजी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे -

१) विकासातील प्रादेशिक असमतोलाचा अंदाज घेण्यासाठी निदर्शके (Indicators) ठरविणे.
२) महाराष्ट्र राज्याच्या सरासरी विकासाच्या संदर्भात प्रादेशिक असमतोल निश्चित करणे. प्रादेशिक असमतोल निश्चित करतांना विविध निदर्शके (Indicators) सन २०१० च्या आकडेवारी नूसार लक्षात घ्यावी. त्यासाठी राज्य सरकारची प्रत्यक्ष गुंतवणुक/खर्च आणि केंद्र व राज्य सरकारने खाजगी औद्योगिक क्षेत्रात केलेली गुंतवणुक याचा विचार करणे.
३) निदर्शके निश्चित केल्यानंतर कोणत्या निदर्शकावर प्राधान्याने अंमलबजावणी होऊ शकेल याची मर्यादा ठरविणे.
४) निश्चित होणारा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविने आणि विकासात्मक निधी वाटणीचे (आवंटनाचे) सुत्र ठरविणे. तसेच भविष्यात पुन्हा प्रादेशिक असमतोल निर्माण होऊ नये म्हणून उपाया सुचविणे आणि त्याबाबत वैधानीक विकास मंडळाची भूमीका काय असावी ? याबाबत सुचना करणे.

### विकासाचा अनुशेष निर्धारीत काढण्याची पध्दती :-

केळकर समितीने महाराष्ट्राचा समतोल प्रादेशिक विकास साध्य करण्यासाठी वेगवेगळया विभागातील विकासातील अंतर लक्षात घेऊन ते अंतर कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येईल, याबाबत शिफारशी करण्याचे कार्य केले. अनुशेषासाठी "**विकासात्मक तूट**" असा शब्दप्रयोग समितीच्या अहवालात करण्यात आला. विकासात्मक घटकांची तूट काढण्यासाठी दळणवळण, शिक्षण व कौशल्य विकास, आरोग्य, कर्ज उपलब्धता व वीज इत्यादी पाच घटक विचारात घेण्यात आले.

वेगवेगळया विभागातील विकासाचा अनुशेष निर्धारीत करण्यासाठी समितीने वरील पाच घटकांचा अभ्यास करण्यापुर्वी प्रादेशिक दरडोई उत्पन्नातील भिन्नतेचे प्रमाण तपासले आहे.

### उत्पन्न :-

सन २०००-०१ ते २००९-१० या दहा वर्षाच्या कालावधी मधील प्रादेशिक दरडोई उत्पन्नाचा तुलणात्मक अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, प्रादेशिक दरडोई उत्पन्नातील भिन्नतेचे प्रमाण भिषण (चिंताजनक) असल्याचे दिसून येते. ते पूढील तक्त्यावरुन लक्षात येते.

**प्रादेशिक दरडोई उत्पन्न (सन २००४-०५ आधार किंमतीवर)**

(सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत)

(आकडेवारी - रुपयांमध्ये)

| अ.क्र. | प्रदेश | सन २०००-०१ | | सन २००९-१० | |
|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम | प्रमाण | रक्कम | प्रमाण |
| १. | उर्वरीत महाराष्ट्र | २३४५२ | १.०० | ६८८१८ | १.०० |
| २. | मराठवाडा | १५५९५ | ०.६६ | ४०८२४ | ०.५९ |
| ३. | विदर्भ | १९३३६ | ०.८२ | ५२२८२ | ०.७६ |
| ४. | महाराष्ट्र | २२८०३ | - | ६०७०८ | - |

वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते की, उर्वरीत महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडयाचे दरडोई उत्पन्न ४० टक्के कमी व विदर्भाचे दरडोई उत्पन्न २७ टक्के कमी आहे. उर्वरीत महाराष्ट्राच्या उत्पन्नाची तुलणा केली असता, मराठवाडा व विदर्भाच्या उत्पन्नात क्रमश: घट झाली आहे. सन २०००-०१ मध्ये अनुक्रमे ०.६६ व ०.८२ व सन २००९-१० मध्ये ०.०७ व ०.०६ ने वाढले आहे.

### विकासातील तफावतीचे प्रमाण

केळकर समितीने महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळया विभागातील विकासात्मक तुटीचे प्रमाण काढण्यासाठी पाच घटकांचा विचार करण्यात आला. त्याबाबतची आकडेवारी पूढील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

| घटक भारांक | समाविष्ट घटक | विदर्भ | मराठवाडा | उर्वरीत महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| ०.२० | संपर्क जाळे | ०.४३ | ०.३१ | ०.२६ |
| ०.२० | शिक्षण व कौशल्य विकास | ०.३६ | ०.३८ | ०.२५ |
| ०.२० | आरोग्य | ०.४१ | ०.३६ | ०.२३ |
| ०.२० | कर्ज उपलब्धता | ०.३६ | ०.३७ | ०.२७ |
| ०.२० | वीज | ०.३८ | ०.४३ | ०.१९ |
| १.०० | विकासातील तफावत | ०.३९ | ०.३७ | ०.२४ |

वर दिलेल्या तक्त्यावरुन असे लक्षात येते की, विकासात्मक तुटीचा असमतोल विदर्भ ३९ टक्के, मराठवाडा ३७ टक्के व उर्वरीत महाराष्ट्र २४ टक्के काढलेला दिसून येतो.

### सिंचन :-

महाराष्ट्रातील विविध विभागातील सिंचनाचा आढावा घेतल्यावर असे लक्षात येते की, सन १९८२-२०१० या दिर्घकाळामध्ये उर्वरीत महाराष्ट्रातील पुणे विभागामध्ये जलद प्रमाणात सिंचनात वाढ झाली आहे. परंतु कोकण,

औरंगाबाद व अमरावती विभागामध्ये सिंचनात तुट राहीली आहे. सन १९६० ते १९८२ या विस वर्षाच्या काळामध्ये ओलीताखालील जमिनीचा वार्षीक वाढीचा दर हा जवळपास सारखा होता. तेव्हापासुन तो उर्वरीत महाराष्ट्राच्या विभागामध्ये तीन दशकाहून अधिक काळ उच्चतर राहिलेला आहे.

**व्यूहरचना :-**

प्रादेशिक असमतोल विकासाबाबत समितीचा दृष्टीकोन विषद करणारे दोन विचारप्रवाह आहेत.

१) सार्वजनिक वस्तूंची समान उपलब्धता व उपयोग करण्याची संधी, यामुळे राज्यातील प्रदेशामध्ये किमान विकासाबाबत तुलना करता येते.

२) पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक साधनसंपत्तीचे समान वाटप करुन प्रादेशिक आर्थिक वृध्दीला गती देणे. जेणेकरुन या विभागामध्ये खाजगी गुंतवणूकीला चालना मिळेल.

३) आदिवासी क्षेत्र व पाण्याची गंभीर समस्या असलेल्या तालुक्यांना विशेष व अत्यावश्यक गरजा निश्चित करतांना समितीने वास्तवात्मक अथवा कल्पीत प्रदेश म्हणून मान्यता देवुन प्रदेशाची संकल्पना मांडली.

**शिफारशी :-**

केळकर समितीने अहवाल तयार करतांना राज्यातील प्रदेशांची साधन संपत्ती विचारात घेतली आणि गतीमान शाश्वत विकासाचे उदीष्ट ठेवले आहे. सर्व प्रदेशाच्या समतोल विकासाच्या धोरणात सर्व प्रदेशासाठी एकसमान तत्व समितीने टाळले आहे.

केळकर समितीने आठ क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केले आहे. प्रशासन, आदिवासी विकास, कृषी, औद्योगिकरण, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि दळणवळण. सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय घटक विचारात घेतल्यामुळे केळकर समितीच्या शिफारशी सर्वसमावेशक आहे.

**योजनांतर्गत संसाधनाचे वाटप :-**

I. योजनांतर्गत संसाधनाचे नियत वाटप सर्वसाधारण क्षेत्र व जलक्षेत्र या दोन क्षेत्रामध्ये ७०:३० या प्रमाणात करण्यात आली आहे. (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उपयोजनाचे १०.२ टक्के व ८.८ टक्के संसाधनाचे वगळून पूढील आठ वर्षाकरीता) जलक्षेत्राच्या वाटपामध्ये पाण्याची गंभीर समस्या असलेले ४४ तालुके, भूस्तर प्रतीकुल असलेले ८० तालुके, खारपाण पट्टा व मालगुजारी तलाव यादृष्टीने महत्वपूर्ण चार क्षेत्रासाठी वाटपात प्राधान्य देण्यात आले.

II. पाण्याची गंभीर समस्या असलेले तालुके, भूस्तर प्रतीकुल तालुके, मालगुजारी तलाव व खारपाणपट्टया करीता पाच वर्षाच्या कालावधीसाठी ठरावीक रक्कम दरवर्षी उपलब्ध करून देणे.

वरील मुद्दयांना अनुसरूण निधीचे वाटप करतांना विदर्भासाठी ३५.२६ टक्के, मराठवाडया साठी २१.५९ टक्के आणि उर्वरीत महाराष्ट्रासाठी ४३.१५ टक्के प्रमाण निर्धारीत करण्यात आले.

III. समितीने सर्वसाधारण क्षेत्रासाठी नियत वाटप करतांना विभाज्य घटक ६० टक्के व अविभाज्य घटक ४० टक्के असे सुत्र ठरविले. विभाज्य साधनसंपत्तीचे वाटप एकुण विकास तृटीचा विचार करुन तीन क्षेत्रामध्ये समितीच्या शिफारशी नूसार करण्यात यावे. तसेच अविभाज्य घटकांसाठी जी रक्कम उपलब्ध असेल ती राज्याच्या संपूर्ण प्रदेशासाठी उपलब्ध राहील. या निधीचा वापर राज्यातील संपूर्ण लोक करु शकत असल्याने ती निधी विशिष्ट प्रदेशासाठी वळती केली असे म्हणण्यास वाव राहणार नाही. या निधीचा विल्हेवाट खालील घटकांच्या आधारे तीन प्रदेशामध्ये विभागणी केली. (मुंबई वगळून)

**मुंबई वगळून टक्केवारी (सर्वसाधारण क्षेत्र)**

| घटक | भारांक | विदर्भ | मराठवाडा | उर्वरीत महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| लोकसंख्या | ४५ | २३.०३ | १८.७४ | ५८.२३ |
| विकासातील तफावत | २५ | ३८.८३ | ३७.२५ | २३.९२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दरडोई उत्पन्न | २० | ३७.६७ | ४३.२८ | १९.०५ |
| क्षेत्र | १० | ३१.७२ | २१.१० | ४७.१८ |
| **एकुण टक्केवारी** | १०० | ३०.७८ | २८.५१ | ४०.७१ |

घटकाला भाराच्या स्वरुपात दिलेले महत्व आणि प्रदेशाचा लोकसंख्येतील वाटा याचा गुणाकार केल्यास येणारा आकडा या घटकांसाठी राहील. (०.४५ X २३.०३) घटकांना देण्यात आलेल्या भारात टक्केवारीशी गुणल्यास आवंटन टक्केवारी प्राप्त होते.

IV. जलक्षेत्र व सर्वसाधारण क्षेत्र यासाठी एकूण प्रादेशिक वाटपाचे तीन प्रदेशातील वाटप विदर्भ ३३.२४ टक्के, मराठवाडा २५.३१ टक्के, तर उर्वरीत महाराष्ट्र ४१.४५ टक्के इतके येईल.

**सुशासन :-**

सुशासनाच्या संदर्भात समितीने एकुण १५ शिफारशी सुचविल्या आहेत. त्यानुसार प्रादेशिक विकास मंडळाची पुर्णरचना यावी. मंडळाचा अध्यक्ष-मुख्यमंत्री, कार्यकारी अध्यक्ष-जेष्ठ मंत्री, त्या प्रदेशातील सर्व मंत्री, दोन विधानसभा व विधान परिषद सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्थांचे दोन अध्यक्ष आणि त्या प्रदेशातील दोन प्रतिष्ठीत नागरीक तसेच मुख्य सचिव व प्रादेशिक विकास आयुक्त हे सदस्य, सचिव असावेत. या मंडळामार्फत प्रदेशाचा विकास आराखडा तयार करणे, पर्यवेक्षण व सनियंत्रण करण्यात यावे.

**शेती :-**

शेतीची भूमीका आणि आव्हाने संदर्भात केळकर समितीने एकुण १७ शिफारशी केल्या. त्यामध्ये प्रादेशिक पाणलोट क्षेत्र अभियान, विदर्भ व मराठवाडयासाठी कापूस आणि पूर्व विदर्भासाठी भात अभियानाची सुरुवात करावी, विदर्भ व मराठवाडयासाठी पशुखाद्य व पशुधन विकास अभियानाची सुरुवात करावी, चंद्रपूर येथे कृषी व वनिकरण विद्यापीठ स्थापन करावे, प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एका कृषी महाविद्यालयाची निर्मिती इत्यादी सुचना केल्या आहेत.

**उद्योग :-**

संपूर्ण राज्यात उद्योगधंद्याचा प्रसार व्हावा यासाठी समितीने आपल्या अहवालामध्ये काही शिफारशी केल्या आहेत. विदर्भ प्रदेशात उद्योगधंद्याला चालना देण्यासाठी उद्योजकांना विक्री करात २ टक्के सुट देण्यात यावी. तसेच खादी, हातमाग आणि त्यांच्याशी निगडीत व्यवसायांना चालना देण्यात यावी. मराठवाडयातील परभणी-हिंगोली व विदर्भातील वाशिम हा प्रदेश टेक्सटाईल्स झोन म्हणुन जाहीर करावे. तसेच मागास प्रदेशामध्ये विशेषत: मराठवाडयात रस्ते निर्मिती करण्यात यावी. त्याचबरोबर सुक्ष्म, लहान व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी सुक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम पत हमी महामंडळाची स्थापना करण्यात यावी.

विदर्भात कृषीवर आधारीत उद्योगांची निर्मिती करणे. उदा. टेक्सटाईल उद्योग, फुडपार्क इत्यादी.

**जलसंपत्तीचा विकास :-**

केळकर समितीने पाण्याच्या बाबतीत आठ वर्षाकरीता शिफारशी केल्या आहेत. त्यामध्ये ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना दररोज किमान १४० लिटर पाणी उपलब्ध करुन द्यावयास हवे. पाणी साठवण निदर्शकांनूसार अमरावती व औरंगाबाद प्रदेशात गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे या भागातील प्रकल्प लवकरात लवकर निकाली काढावे. (विशेषत: विदर्भातील अपूर्ण प्रकल्प प्राधान्यक्रमाने पुर्ण करावेत) अमरावती प्रदेशातील खारपटटा भागासाठी जे आर्थिक व तांञिक निकष आहेत त्यामध्ये सुधारणा करणे.

समितीने अहवालात सिंचनक्षम जमिनीची (Irrigated Land) अशी नवी व्याख्या दिलेली आहे. त्यानूसार वर्षातील किमान आठ महिने पाणी पुरवठयाची शाश्वती आहे.

**आरोग्य :-**

समितीने मानवी आरोग्याच्या संदर्भात समतोल प्रादेशीक विकास साध्य करण्यासाठी एक वैश्विक मिशन चालू करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या आरोग्य सेवा सुविधांमध्ये असमतोल आहे. समितीच्या मते आरोग्याची अंदाजीत तृट विदर्भात १२१.८ टक्के, मराठवाडयात १०८.९ व उर्वरीत महाराष्ट्रात ६९.३ टक्के आहे.

ही तुट भरुन काढण्यासाठी चार टप्प्यात आरोग्य केंद्रे सुरु करावीत.

**शिक्षण :-**

प्रत्येक प्रदेशातील नागरिकांच्या शिक्षण हक्कांचे संरक्षण करण्यासाठी समितीने शिफारशी केल्या आहेत. त्यामध्ये माध्यमीक स्तरावर गुणांकन पध्दती सुरु करणे, इयत्ता आठवी पर्यंत परिक्षा न घेण्याचा शासनाच्या धोरणाचा पुनर्विचार आणि शिक्षण हे एक मिशन म्हणून राबविणे आवश्यक आहे. जेणेकरुन समाजातील दुबळया घटकांना त्याचा फायदा झाला पाहिजे.

**संपर्क जाळयांचा विस्तार करणे :-**

राज्यातील संभाव्य ७०३५ कि.मी. लांबीचे रस्ते निर्मिती करतांना १६ रस्ते तयार करुन पुर्व-पश्चिम टोक जोडावे आणि रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गाचा पाठपुरावा करावा अशी शिफारस केळकर समितीने केली आहे.

**सारांश :-**

महाराष्ट्राच्या प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक समित्या नेमल्या आणि त्यांनी आपला अहवाल शासनास सादर केला आहे. त्या समित्यांच्या तुलणेत केळकर समिती ही अगदी सकृतदर्शी (Realistic) सर्वसमावेशक दृष्टी आणि दृष्टीकोन असलेली समिती आहे. समितीने सार्वजनिक वस्तूचे समानाची वाटप व सार्वजनिक संसाधनाचे समान वाटप होण्याची गरज आहे. त्यादृष्टीने एक संख्यात्मक धोरण ठरवावे लागेल आणि प्रशासनात सुधारणा करणे आवश्यक आहे. जेणेकरुन या विभागामध्ये खाजगी गुंतवणूकीला चालना मिळेल आणि आर्थिक वृध्दीला गती मिळू शकेल.

केळकर समितीने अहवालात "**विकासात्मक तूट**" हा शब्दप्रयोग केला आहे. त्या अनुषंगाने समितीने दळणवळण, शिक्षण, आरोग्य, कर्ज उपलब्धतेची व्यवस्था व वीज इत्यादी घटकांचा अभ्यास केला. त्यासोबतच समितीने सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय घटक विचारात घेतले. यासर्व घटकांचा अभ्यास करुन विकासात्मक तुट निर्धारीत केली आणि ती तुट कशा पध्दतीने कमी करता येईल त्यादृष्टीने शिफारशी केल्या आहेत.

समितीने महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाची व्यवस्थीत मांडणी आणि विश्लेषण केले. प्रादेशिक सबलीकरण साध्य करण्यासाठी मार्ग व व्युहरचना सांगितली. अलीकडील काळातील ज्या विविध समित्यांनी महाराष्ट्रातील प्रादेशिक असमानतेच्या बाबतीत जे मत मांडले, त्या तुलणेत केळकर समितीने प्रभावी संशोधन पध्दती आणि त्याची असणारी उपयुक्तता अभ्यासली गेली. केळकर समितीने जो अहवाल महाराष्ट्र शासनास सादर केला आहे. त्यातील कोणत्या शिफारशी स्विकाराच्या आणि कोणत्या नाही हा अधिकार सरकारचा आहे.

**संदर्भ :-**

१) महाराष्ट्र शासन (२०१३) :- महाराष्ट्राचा समतोल प्रादेशिक विकासावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल.
२) प्रा.विजय रोटे, महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकास प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीच्या प्रमुख निष्कर्ष व शिफारशींचा मागोवा अर्थ मिमांसा (जाने-जून २०१६/ खंड ९, अंक १) पृष्ठ क्र.६९-७५.
३) डॉ.विनायक देशपांडे, केळकर समिती अहवाल : प्रादेशिक विकासाचा मार्गदर्शक दस्तऐवज ; अर्थमिमांसा (जाने-जून २०१६/ खंड ९, अंक १) पृष्ठ क्र. ३४-४३.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with*
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
संशोधन शिल्प

# प्राचीन भारतीय नगर रचना

**प्रा. एन. आर. ठवळे,**
इंदिरा महाविद्यालय, कळंब

सिंधू संस्कृतिच्या उत्खननामुळे प्रचीन भारतातील नगररचने संदर्भात आपणांस माहिती प्राप्त होते. मोहेंजोदरो या शहराचे उत्खनन करतांना एक मोठा रस्ता सापडला. त्याची रुंदी ३३फुट असून तो त्या शहराचा मुख्य रस्ता होता. त्याशिवाय त्याला समांतर लहान लहान अनेक रस्ते होते. त्यांची रुंदी १८ ते ९ फुट रुंद होती. या संपूर्ण रस्त्यांचे एक वैशिष्टे म्हणजे उत्तर–दक्षिण–पूर्व–पश्चिम एका सरळ रेषेत त्यांची आखणी होती. त्याचा एक फायदा असा होता की हवेच्या एका झोताने हे सर्व रस्ते साफ व स्वच्छ होत असे. मुख्य रस्ता व लहान रस्ते यांच्या दोन्ही बाजूला घरे बांधली होती. कोणत्याही रस्त्यावर अतिक्रमण झाले असे दिसत नाही. यावरुन तेथिल शासनव्यवस्था अत्यंत कडक असावी. चौफुली, वरच्या घरांना अर्धगोलाकार आकार दिला होता. परिणामता दळणवळण करतांना घरांना कोणताही आघात होत नव्हता. घराघरातील संपूर्ण सांडपाणी वाहून नेण्यासाठी लहान लहान नाल्या बांधल्या होत्या आणि त्या मुख्य रस्त्याला लागून बांधलेल्या मोठ्या गटाराला जोडल्या होत्या त्यामुळे संपूर्ण सांडपाणी मुख्य गटारातून शहराबाहेर सोडले जात असे. मुख्य गटार अत्यंत खोल असून त्यातून एक उभा माणूस सहज चालू शकत असे. गटाराला विशिष्ट अंतरावर झाकणे होती. त्यातुन गटारांची साफसफाई केली जात असे. सांडपाण्याची एवढी चांगली व्यवस्था जगातील कोणत्याही संस्कृतित आढळली नाही. सिंधू संस्कृतिनंतरच्या काळात भारतीय नगरस्थापनेत दिवसेंदिवस सुधारणा झाल्याचे लक्षात येते. शहर निर्माण करत असतांनाच त्याच्या संरक्षणाची योग्य व्यवस्था व्हावी याचा विचार करुनच जागेची निवड केली जाई. बहुतांश शहरे मोठ्या नद्यांच्या काठी स्थापन केलेली दिसतात. नगरांची स्थापना करण्यापूर्वी नगरमापन केल्या जाई. राजवाडा, सरकारी इमारती, बाजार, खंदक, परकोट आणि सामान्य लोकांची घरे इत्यादिंचा विचार करुन नगर वसवले जाई. मौर्य काळात पाटलीपूत्र ही देशाची राजधानी होती. त्यामुळे त्या शहराची संरक्षण व्यवस्था उत्तम होती. असे मेग्यासेनिस नावाचा ग्रिक लेखक म्हणतो. सिंधू संस्कृती मध्ये शहरांचे संरक्षण करण्यासाठी खंदक खोदले जाई. त्याचे अवशेष आजही प्राप्त होतात. प्राचीन काळी साधारणत: खंदकाचे तीन प्रकार होते. पहीला प्रकार म्हणजे जलखंदक, शहर जर नदिच्या काठावर असेल तर त्या शहराभोवतीच्या खंदकाला नदी जोडली जाई, त्यामुळे नदीच्या पाण्याचा प्रवाह खंदकात शिरुन शहराचे संरक्षण होई. त्या खंदकात मगरीसुद्धा सोडल्या जात. काही ठिकाणी कमळ किंवा पाण्यात उगवणाऱ्या वनस्पती लावल्या जाई. खंदकाचा दुसरा प्रकार म्हणजे कर्दम खंदक म्हणजे चिखलाने भरलेला खंदक आणि तिसरा प्रकार म्हणजे शुष्क खंदक म्हणजे कोरडा खंदक. प्रत्येक खंदकाचे आपआपल्या परिने महत्वाचे स्थान होते. पाटलीपुत्र या शहराभोवतीच्या जलखंदक ६० फुट रुंद व १५ फुट खोल होता, असे मेगॅस्थेनिस म्हणतो तर कौटिल्याने तीन पुरुष खोल खंदक होता असे म्हणतो. पुरुष म्हणजे हात उंच करुन उभा असलेला माणूस म्हणजे एक पुरुष. उंची व खोली मोजण्याचा हा एक प्रकार प्राचीन भारतात होता. खंदक खोदताना जी माती किंवा मुरुम निघत तो खंदकाच्या बाजूला टाकुण हत्तीच्या पायाने दाबून त्यावर एक भिंत तयार केली जाई. हा प्रकार मोगल काळापर्यंत सुरु होता. पुढे माती ऐवजी विटांचा वापर करुन परकोट उभारणे सुरु झाले. दक्षिण भारतात दगडांचा वापर सुरु झाला.

शहरांभोवती जो परकोट बांधला जाई त्यावर ठराविक अंतरावर टेहाळणीसाठी बुरुज बांधले जाई. पाटलीपुत्रच्या परकोटावर ५७० बुरुज होते. प्रत्येक बुरुजावर खडे सैनिक रात्रंदिवस पहारा करित असे. परकोटाच्या भिंतीवर मधेमधे छीद्र होती. आक्रमण आले तर त्यामतून धनुष्यबाणाचा मारा करण्यासाठी ती व्यवस्था होती. परकोटाला एक मुख्य दरवाजा असे त्याला गोपूर म्हटले जाई. भोवताल आवश्यकते नुसार इतर दरवाजे होते. रस्ता ज्या शहराकडे जाई त्या शहरांची नावे त्या दरवाज्यांना होती. पुढे मोगल काळातही हीच पद्धत कायम होती. दरवाज्यांना मजबूत फाटक असे. साधारणत: रात्री ९.०० वाजता शहरांची दारे बंद होई. रात्री जर एखाद्या प्रवासी दार बंद झाल्यावर आलाच तर त्याला शहरात प्रवेश करता येत नसे. रात्री त्याला तिथेच राहावे लागे. सकाळी दरवाजा उघडल्यानंतर त्याला शहरात प्रवेश मिळत असे. शहरांची लोकसंख्या

वाढल्यानंतर नविन घरांची निर्मिती करण्याकरीता खंदक बुजवल्या जाई. तसेच परकोट तोडून पलीकडे नवीन घरे बांधली जात. त्यानंतर खंदक व परकोट उभारण्यात येई किंवा तसे जर केले नाही तर त्या शहराचे नवीन उपनगर निर्माण करण्यात येई. त्याला शाखानगर असे सुद्धा म्हटले जाई.

शहरातील रस्ते रुंद व पूर्व–पश्चिम–उत्तर–दक्षिण एका सरळ रेषेत निर्माण केले जाई. रस्त्याच्या मधभागी उंच व दोन्ही बाजूंचा भाग त्यापेक्षा थोडे कमी उंच ठेवण्यात येई त्यामुळे रस्त्यावर पाणी गोळा होत नसे. रस्त्याच्या दोन्ही बाजूली नाल्या होत्या त्यामुळे पावसाचे व सांडपाणी शहराबाहेर वाहून जात असे. काही शहरातील प्रामुख्याने मोठ्या शहरात पायदळ लोकांना जाण्यासाठी वेगळा रस्ता व वाहतूकीच्या साधनांना येण्या जाण्यासाठी त्याला समांतर दुसरा तयार करीत असे. चौरस्त्याच्या बाजूला व्यापाऱ्यांची दुकाने, व्यापारी प्रतिष्ठाने निर्माण केली जात.

शहराच्या केंद्रस्थानी (अर्थात राजधानीचे शहर असेल तर) राजमहाल असे. चंद्रगुप्त मौर्याचा राजमहाल पाटलीपुत्र नगरीच्या केंद्रस्थानी होता असे मेगॉस्थेनिसने म्हटले आहे. संरक्षणाच्या दृष्टीने महाला भोवती उंच असा परकोट बांधला जाई. राजमहाल अनेक विभागात विभागला जाई. कपीलवस्तूचा राजा शुद्धोधनचा राजमहाल एवढा मोठा होता की, गौतमबुद्ध जेव्हा कौटुंबीयांना भेटण्यासाठी आला तेव्हा त्याच्या पर्यंत पोहचण्यासाठी त्याचा भाऊ नंदला बराच वेळ लागला त्यामुळे राजमहालाच्या विशालतेबद्दल तो नाराज झाला असे वर्णन बौद्धसाहित्यात आहे. राजमहालाचे जे विभाग होते त्याला कक्ष महटले जाई. प्रथम कक्षेत गजशाळा, रथशाळा, घोडेपागा असे. दुसऱ्या कक्षेत राजाची आमसभा असत. तिला बाह्यस्थान (मंडप) म्हटले जाई, येथे सरकारी कर्मचारी, जमीनदार, राजासोबत सल्ला मसलत करित असे. तिसरा विभागात (कक्ष) राजा आपल्या विश्वासू व अत्यंत जवळच्या लोकांसोबत चर्चा करत, त्यास मुक्तस्थान मंडप म्हटले जाई. हा राजाचा खास दरबार होता. राजा व राणीचे शयन कक्ष राजवाड्यात अगदी केंद्रस्थानी होते. शयन कक्ष अत्यंत कलात्मकतेने सजवला जाई. राजमहालात सुंदर बगीचे, कारंजी लहान तलाव इत्यादी राहत असे. चंद्रगुप्त मौर्याचा राजमहाल अत्यंत सुंदर होता. बगीच्यात देशी विदेशी वृक्षाची लागवड केली होती. औषधी वनस्पतीसुद्धा देश विदेशातून मागवली होती आणि राजमहाल अत्यंत कुशलतापूर्वक कलात्मकतेने सजवला होता.

सर्वसामान्य लोकांची घरी शहराच्या विशिष्ठ भागात होती. साधारणत: एकाच प्रकारचे उद्योगधंदे करणारे लोक नावावरुन त्यांच्या मोहल्याला नावे दिली जाई साधारणत: सर्वांची घरे सारख्या प्रकारची, आकाराची असावी त्याकडे त्या लोकांचा कल असत. प्रत्येक घर दोन भागात विभागले जाई. एक म्हणजे बाहेरील भाग आणि दुसरा आतील भाग. घराच्या बाहेरील भागात साधारणत: पुरुष मंडळी वावरत असे व आतील भागात महीला मंडळी वावरत असे. त्यातही बाहेरील व आतील भागात अनेक खोल्या होत्या त्यात स्नानगृह, स्वयंपाकगृह, शयनकक्ष इत्यादी. घराचा मुख्य दरवाजा राजमार्गाकडे असत तर शौचालय घराच्या पाठीमागे असत. श्रीमंताची घरे, मुख्य प्रवेशद्वारे अत्यंत देखणे व सजवलेले असे. घरे साधारणत: दोन मजली होती, वरच्या मजल्यावर जाण्यासाठी पायऱ्या होत्या. घरांना हवा व प्रकाश येण्यासाठी खिडक्या होत्या. त्यांना वातायन म्हटले जाई. घरांना साधारणत: पांढरा रंग देण्याची पद्धत होती. श्रीमंत व शोकीन लोकांच्या घरी लाकडी पलंग होते. पलंगावर डोके ज्या भागाकडे राहील त्या भागाकडे एक लाकडी पेटी पलंगाला जोडलेली असे. त्या पेटीत सुगंधीद्रव्य, फुलांच्या माळा, विविध प्रकारचे लेप, मुखसुगंधी पदार्थ ठेवलेले असत. घरांच्या भिंतीवर खुंट्या असत. त्या कधी हस्तीदंताच्या सुद्धा राहत असे. मनोरंजनाच्या वस्तुसुद्धा घरात राहत असे. घरात सुंदर बगीचे, त्यात हिरवळ, वृक्षाखाली झोपाळे इत्यादी असत. अर्थात हे सर्व श्रीमंत लोकांच्या घरी असे. शहराच्या साफसफाईची विशेष काळजी शहर प्रशासन घेत असे. स्मशानभूमी शहराच्या बाहेर होती. स्मशानात प्रेत नेण्याचा मार्ग स्वतंत्र होता. तसेच प्रेत ठरलेल्या वेळातच स्मशानात न्यावा लागत असे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना प्रशासन दंड आकारत असे.

प्राचीन काळी भारतावर अनेक आक्रमणे झाली. त्यात प्रामुख्याने शक, यवन, कुषाण, हूण इत्यादी आक्रमणाचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी मोठमोठी शहरे लुटमार करुन उद्धवस्त केले. कालांतराने ही शहरे पुनर्निमाण करण्यात आली. कोशांबी, अयोध्या, हस्तिनापूर ही शहरे पुरामुळे वाहून गेल्याचा उल्लेख वैदिक साहित्यात आढळतो.

प्राचीन भारतात नगरप्रशासनाचा उल्लेख ग्रीक लेखक मेगॉस्थेनिसच्या साहित्यात आढळतो. त्याने पाटलीपुत्र शहराची नगर प्रशासन व्यवस्था कशी होती याबद्दल लिहीले आहे. तो म्हणतो शहराचे प्रशासन चालवण्यासाठी नगरसभा आस्तीत्वात होती. तिचे सहा स्वतंत्र विभाग होते. प्रत्येक विभागात पाच सभासद होते. सर्व विभाग मिळून तीस सभासद होते. प्रथम समिती कला विभाग समिती. ती निर्माण कार्य करणाऱ्या वर्गाकडे लक्ष देत असे. त्याचा सोई, गैरसोई पाहत असून समस्यांचे समाधान करत असे. दुसरी समिती परदेशी लोकांची देखरेख, त्यांच्या सोई सुविधांकडे लक्ष देत असे. तिसरी समिती जन्म मरणाची नोंद ठेवत असे. चौथी समिती बाजार नियंत्रण करत असे. पाचवी समिती व्यवसाय व उद्योगधंद्याचा विकास पाहत असे आणि सहावी समिती बाजारातील वजनमापांकडे लक्ष ठेवत असे. शहरात याशिवाय सार्वजनिक दवाखाने, शिक्षण, मंदिर व्यवस्था, पाणी पुरवठा, इत्यादीची कामे नगर पालीका स्वत: पाहात असे. नगर प्रशासनाचा प्रमुख अधिकाऱ्याला नागरक या नावाने ओळखले जाई. तो स्वत: सर्व कामाकडे जातीने लक्ष देत असे.

शहराच्या मुख्य दरवाज्यावर चुंगीकर विभागाचे ऑफिस होते. तेथील प्रमुख अधिकाऱ्यास शुल्काध्यक्ष म्हटले जात. येणाऱ्या मालावर तो चुंगीकर वसूल करित असे. शहरात गणिकाध्यक्ष नावाच्या अधिकारी होता तो वेश्याव्यवसायात असलेल्या गणिकांकडून कर वसूल करित असे. विविध शहरात विविध व्यवसाय चालत असे. त्या व्यवसायीकाकडून सुद्धा कर वसूल केला जात असे याशिवाय पाणीपट्टीकर, कुरणावर कर वसूल केला जाई. येणाऱ्या सरकारी उत्पन्नातून कर्मचाऱ्यांचा पगार व जन कल्याणाची कामे राजघराण्याचा खर्च चालत असे.

शहरात एक मुख्य न्यायालय होते. तेथे दिवाणी व फौजदारी दोन्ही प्रकारचे खटले चालत असे. न्यायदान करत असतांना राजा निपक्षपातीपणावर भर देत असे. राजधानीच्या शहरात राजा स्वत: न्यायदान करित असे किंवा गैरहजेरीत एखाद्या निपक्षपाती व्यक्ती ज्याला धर्मशास्त्राची माहिती आहे अशा व्यक्तीची नेमणूक करत असे. मृच्छकटीक नाटकात उज्जैनच्या न्यायालयाचे एक दृष्य वर्णीत केले आहे. ब्राम्हण व्यक्ती चारुदत्त जो गरीब पण आदर्श व्यक्ती त्याला राजाचा साळा शकार ने खुनाच्या आरोपात अडकवले आणि मुख्य न्यायाधिशावर दबाव आणल्यामुळे चारुदत्त विरोधी निकाल लावला गेला. तेव्हा शहरातील प्रजेने न्यायाधिशा विरोधी वातावरण निर्माण केल्याचा उल्लेख आहे. या घटनेसारख्या घटना आजही आपल्या देशात घडतात. प्रजा निरपराध व्यक्तीच्या बाजूने बोलतात पण शेवटी कालांतराने त्या घटनांवर पडदा पडतो. लोक विसरुन जातात.

**संदर्भ :–**

१) प्राचीन भारतका इतिहास – ले. सत्यकेतू विद्यालंकार
२) ऐतिहासिक मानचित्रावली – रश्मिता राणी
३) हमारे पुराने नगर – डॉ. उदय नारायण राय
४) प्राचीन भारताचा इतिहास – मा. म. देशमुख
५) प्राचीन भारताची रुपरेषा – प्रा. वसंत भागवतकर
६) प्राचीन भारताचा इतिहास – डॉ. शरद कोलारकर

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with*
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
संशोधन शिल्प

# शेती पुरक कुटीर आणि लघु उद्योग

**प्रा. श्रीमती आर. एम. वाठ**
इंदिरा महाविद्यालय, कळंब
वाणिज्य अधिव्याख्याता

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतात जवळपास ६० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबुन आहे. भारतात आर्थीक विकास करायचा असेल तर शेतीपुरक व्यवसायाला चालना देणे गरजेचे आहे. अन्य देशामध्ये शेतीचा विकास झाला त्यामुळे तेथे ग्रामीण विकासही झाल्याचे दिसुन येते. अमेरिकेचे महासत्ता बनण्याचे मुख्य कारण म्हणजे तेथील सक्षम शेती विकास होय. इस्त्रायल देशात ना सुपीक जमीन, ना पाणी तरीही तो देश शेतीच्या विकासामुळे सक्षम आहे. इतर देशामध्ये शेतीला व्यवसाय म्हणुन बघीतले जाते. म्हणुन ते देश प्रगतीशील देश आहे. भारतात नैसर्गिक साधनसामुग्री व हवामानाचे वरदान आहे. तसेच भारत हा तरुणांचा देश म्हणुन ओळखला जातो. भारतात १८ ते २३ वर्षे या वयोगटातील तरुणांची २०१६ पर्यंत संख्या १४ कोटी १५ लाख असेल असा विकास मंत्रालयाचा अंदाज आहे. या तरुणांच्या शक्तीचा शेतीपुरक व्यवसायाकडे वळविले तर भारताचा आर्थिक विकास झाल्याशिवाय राहणार नाही. भारतात शिक्षीत आणि अशिक्षित अशा दोन्ही तरुणांची बेरोजगारी मोठया प्रमाणावर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना या वास्तवतेचे भान आहे त्यामुळेच त्यांनी स्कील इंडिया, मेक इन इंडीया आणी डीजीटल इंडिया या योजनेच्या घोषणा केल्या. या घोषणा न राहता वास्तवात उतरल्या तर खऱ्या अर्थाने भारताचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही याचा फायदा तरुण पिढीला नक्की होईल. पुजनीय राष्ट्रपिता महात्मा गांधीचे म्हणणे होते की, मी दृढविश्वासाने सांगतो की, देशाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी देशातील खेडेगावांचा आणि शेतीचा विकास करण्याच्या विविध योजनांना अग्रक्रम दिला पाहिजे. बेरोजगारीचे मुळ उखडुन टाकण्यासाठी गावातील कुटीरउद्योग आणि शेतीचा विकास ही दोन उत्तम साधने आहेत. तसेच स्व. भुतपुर्व लालबहादुर शास्त्री यांनी जय जवान जय किसान च्या घोषणा देऊन अनेक योजना राबविल्या. भारतात नैसर्गिक साधनसामुग्री भरपुर आहे. परंतु त्याचा पुरेपुर उपयोग न केल्यामुळे भारताची प्रगती होऊ शकली नाही. महात्मा गांधी म्हणायचे की, नैसर्गिकरित्या श्रीमंत असणाऱ्या देशातील आपण गरीब लोक म्हणुन आपण शेती व्यवसायाला पुरक असे अनेक कुटिर उद्योग व लघुउद्योगांना चालना दिली तर भारताची प्रगती झाल्या शिवाय राहणार नाही.

शेतीव्यवसायाला पुरक असे काही लघु उद्योग व कुटीर उद्योग शेतकऱ्यांनी स्थापन केल्यास भारताचा आर्थिक विकास नक्की होईल.

१) **ब्रँडेड आटा :** शहरातील महीलांना तसेच नोकरी करणाऱ्या महीलांना आज पुरेसा वेळ नसतो. गव्हाचे पीठ दळुन जर त्यांना ब्रँडेड चांगल्या प्रतिचा आटा मिळवुन दिला तर त्या व्यवसायाची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही.

२) **रिफाईंड तेल :** ज्या शेतकऱ्यांकडे शेंगदाने, सोयाबीन, तिळ, जवस पिकते त्यांनी स्वत:ची तेलाची घाणी निर्माण करुन रिफाईंड तेल तयार करण्याचा व्यवसाय करु शकतात.

३) **आंबा :** पिकलेल्या आंब्यापासुन बर्फी, पोळी, जॅम, आमरस तयार करता येतो. तर कच्च्या आंब्यापासुन निरनिराळे प्रकारचे लोणचे, चटणी, आमकुट, पन्हे, सरबत, स्कॅश तयार करुन विकता येते.

४) **हळद :** हळदीचे पावडर, हळदीचे लोणचे तयार करता येते.

५) **लाल मिरची :** मिरची पावडर, लोणचे, चटणी तयार करता येते.

६) **निंबु :** सरबत, लोणचे, स्क्वॅश तयार करता येते.

७) **आवळा :** च्यवनप्राश, मोरावळा, लोणचे, आवळा सुपारी, कँडी, सरबत, पल्प तयार करता येतो.

८) **टोमॅटो :** टोमॅटो नाशवंत असल्यामुळे अनेक मोठया हॉटेल व्यवसायात टोमॅटो पावडरचा उपयोग केला जातो. अशा प्रकारे टोमॅटो सुप, लोणचे तयार केली जातात.

९) **केळी :** वेफर्स, कच्च्या केळाची भुकटी

१०) **जांभुळ :** रस, सरबत, स्क्वॅश, जॅम, बियांची भुकटी

११) **सोयाबीन :** सोयाबीन दुध लहान बालकांसाठी पौष्टीक

१२) **सुर्यफुल :** सुर्यफुलाच्या बियापासुन तेल जे मानवाच्या आरोग्याला लाभदायक आहे याच्या पेंडीपासुन पशुखाद्य उद्योग देखील केला जाऊ शकतो.

१३) **दाल मिल :** मिनी दाल मिल टाकुन तुर, चना यापासुन डाळ तयार करता येते. तसेच गहु, ज्वारी कडधान्याची प्रत मध्ये सुधारणा करता येते.

१४) **कडुनिंब :** कडुनिंबाच्या झाडापासुन अनेक फायदे आहेत. कडुनिंबाच्या बियांना निंबोळी म्हणतात. याचे अनेक फायदे आहेत. याचा उपयोग औषध तयार करण्यासाठी व सौंदर्यप्रसाधनामध्ये उपयोग होतो तसेच यापासुन खत सुध्दा तयार होते.

१५) **चिंच :** चिंचेचा पल्प, पावडर तयार केले जाते, गराचा उपयोग भेळपुरी, मिसळ, पाणीपुरी मध्ये होतो. मोठमोठया हॉटेल मध्ये पदार्थांना चव आणण्यासाठी चिंचेचा उपयोग करतात. चिंचोक्यापासुन स्टार्च पावडर तयार केले जाते. टरफलाचा उपयोग चॉकलेट, टॉफी मध्ये केला जातो.

१६) **सुका भाजीपाला :** पालक, मेथी, करडई, आंबटचुका, अळु, तांदुळसा याचे सुकवुन पावडर तयार केले जाते. याचा उपयोग मोठया हॉटेल्स, मॉल, धाबा येथे केला जातो. टोमॅटो, भेंडी, वटाणा, फलॉवर, भोपळा, दोडके या भाज्यांवर प्रक्रिया केल्यास विक्री करता येते.

१७) **बोर :** बोरकुट, लोणचे, मुरब्बा, सरबत जैम तयार करता येते.

१८) **कोरफड :** आज अनेक रोगावर कोरफडचा उपयोग होतो. तसेच सौंदर्य प्रसाधनामध्ये सुध्दा याचा उपयोग होतो.

१९) **कवठ :** जेली, सरबत, सिरप, बर्फी तयार करता येते.

२०) **फळ :** संत्रा, मोसंबी, अननस, स्ट्रॉबेरी, खरबुज, सिताफळ या फळांचे बगीचे तयार केले तर या पासुन वर्षभर तयार केले तर या पासुन वर्षभर चालणारे उद्योग चालवता येते. उदा. सरबत, जॅम, जेली, सिरप, डबाबंद फोडी, चॉकलेट, आईस्क्रीम ई.

२१) **बटाटा :** यापासुन वेगवेगळे वेफर्स तयार करता येते.

२२) **वटाणा :** गोठवलेला वटाणा व वाळलेल्या वटाण्याची मागणी बाजारपेठेत मोठी आहे.

२३) **मेथी :** हिरवी मेथी वाळवुन कसुरी मेथी तयार करता येते ज्याचा उपयोग मोठया हॉटेल्स, धाबा यावर होतो. तसेच वाळवुन मेथील मार्केट मध्ये विकता येते.

२४) **कोकम :** आमसुल, सरबत, जॅम बियांपासुन तेल तयार करता येते.

२५) **पशुखाद्य :** जनावरांचे खाद्य, शेतीमधील टाकाऊ पदार्थापासुन तयार करता येते. मका, सुर्यफुलांची टरफल, कडबा, उसाचा पाचट, बारीक कुटटा यावर गुळपाणी, मिठाचे द्रावण पसरवुन पशुखाद्य तयार करता येते.

२६) **गोमुत्र व शेणखत :** गोमुत्र एका मोठया टाकीमध्ये जमा केल्यास याचा उपयोग पिकांवर फवारणी करुन किड नाशकावर नियंत्रण आणता येते. तसेच शेणखता पासुन सेंद्रीय खत तयार करता येते.

२७) **गाय दुध संकलन व विक्री :** गावा-गावातुन गाईचे दुध संकलन करुन त्याचा मोठया शहरात विकुन व्यवसाय करता येतो.

२८) **गांडुळ खत निर्मीती**

२९) **रेशीम उद्योग**

३०) **कुक्कुट पालन उद्योग**

३१) **बाभळी :** बाभळी झाडाचा देखील आयुर्वेदिक औषध तयार करण्यासाठी उपयोग होतो.